POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष -०५ ● अंक-२३५ ● मुंबई, रविवार, २९ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

घरगुती गॅसचं संकट आता मुंबईतही...

ऑनलाईन नंबर लागेना, एका सिलेंडरसाठी एजन्सीबाहेरच झोपून काढली अख्खी रात्र

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

गेल्या काही दिवसापासून देशात घरगुती गॅसचं संकट निर्माण झालं आहे. महाराष्ट्रात ग्रामीण भागात गॅस सिलेंडरसाठी रांगाच रांगा लागल्याचं चित्र होतं. पण आता हे संकट राज्यातील ग्रामीण भागापुरतं मर्यादित राहिलेलं नाही. मुंबईतही या संकटाने धडक दिली आहे. मुंबईतही लोक पहाटे 6 वाजल्यापासूनच सिलेंडरसाठी एजन्सीबाहेर रांगा लावून आहेत. तर भिवंडीत नागरिकांनी एजन्सीच्या बाहेरच अख्खी रात्र झोपून काढली आहे. यावरून घरगुती गॅस सिलेंडरचं संकट किती गंभीर होत आहे हे दिसून येत आहे.

इराण-इस्त्रायल युद्धामुळे इंधनाचे गाड्या रोखल्या जाण्याची भीतीने तसेच ऑनलाइन बुकिंगमध्ये तांत्रिक अडथळे आणि घरपोच सेवेत दिरंगाई होत असल्याने नागरीक हवालदिल झाले आहेत. अनेक जण कामावरून सुट्टी घेऊन सिलेंडरसाठी सकाळी 6 वाजल्यापासून रांगेत उभे आहेत. प्रशासनाने जरी पुरेसा साठा असल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात गॅस एजन्सींवर भली मोठी झुंबड उडत आहे. काही ठिकाणी 8 दिवसांपासून सिलेंडर मिळत नसल्याने नागरिक संताप व्यक्त करत आहेत. मुंबईतील कुर्ला, दादर, नायगाव, कांदिवली, चारकोप इथे नागरिक रांगेत उभे असलेले दिसत आहेत. मुंबईतील दादरच्या नायगावमध्ये गॅस सिलेंडरसाठी आज सकाळी 6 वाजल्यापासून एजन्सी बाहेर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या दिसल्या.

घरगुती गॅस सिलेंडरच्या तुटवड्यामुळे ग्राहकांना एजन्सीबाहेर लांबच लांब रांगा लावाव्या लागत आहेत. आखाती देशांतील युद्धामुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम झाल्याची भीती आणि ऑनलाइन बुकिंगमध्ये अडचणींमुळे नागरिक थेट एजन्सीवर गर्दी करत आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता संयम राखण्याचे आणि अधिकृत माहितीवर विश्वास ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



एजन्सी बाहेर झोपून रात्र काढत सिलेंडरसाठी लावली रांग

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धांमुळे गॅसचा तुटवडा भासत असून त्याचा मोठा फटका भिवंडी शहरातील कामगार वर्गाला बसत आहे. भिवंडी हे कामगारांचे शहर म्हणून ओळखले जात असून येथे मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग 5 किलोच्या कमर्शियल गॅस सिलेंडरवर अवलंबून आहे. मात्र सध्या गॅस तुटवड्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅस एजन्सीकडे दररोज केवळ 40 ते 50 सिलेंडर उपलब्ध होत असल्याने ह्मजे लवकर पोहोचतील त्यांनाच सिलेंडर मिळेलह्म अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हे कामगार रात्रीपासूनच रांग लावून ठेवत आहेत. एवढेच नव्हे तर सिलेंडरसाठी नंबर लावून हे कामगार जिथे जागा मिळेल तिथे झोपून रात्र काढत आहेत, जेणेकरून त्यांना सिलेंडर उपलब्ध होईल. खरं म्हणजे केवळ 40 ते 50 सिलेंडरचे वाटप होत असल्याने आपला नंबर कसा येईल यासाठी कामगार रात्रीपासूनच एजन्सीबाहेर रांगा लावत आहेत. पहाटेपर्यंत ही गर्दी वाढत जाते, मात्र मर्यादित पुरवठ्यामुळे अनेकांना रिकाम्या हाताने घरी परतावे लागत आहे. गेल्या तीन-चार दिवसांपासून सतत रांगेत उभे राहूनही सिलेंडर न मिळाल्याने कामगार वर्गात नाराजी पसरली आहे. गॅसअभावी जेवण बनवणेही कठीण झाले असून रोजच्या जगण्यावर परिणाम होत आहे. हॉटेलचे जेवण तसेच शेगडीवर अन्न शिजवणे परवडत नाही. या पार्श्वभूमीवर कामगारांनी प्रशासनाकडे 5 किलो कमर्शियल गॅस सिलेंडरचा पुरवठा वाढवण्याची मागणी केली आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये रांगा कायम

छत्रपती संभाजीनगरमध्ये घरगुती गॅसचा तुटवडा अजूनही नागरिकांना भेडसावत असल्याचं चित्र आहे. शहरातील एपीआय कॉर्नर परिसरात भारत गॅस एजन्सीसमोर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या पाहायला मिळत आहेत. गॅस सिलेंडरसाठी नागरिकांना अक्षरशः पहाटे 5 वाजल्यापासून रांगेत उभं राहावं लागत आहे. एजन्सी सुरू होण्यापूर्वीच मोठी गर्दी होत असून नागरिक ताटकळत प्रतीक्षा करत आहेत. अनेक दिवसांपूर्वी बुकिंग करूनही वेळेत गॅस सिलेंडर मिळत नसल्याचा संताप नागरिकांनी व्यक्त केला आहे.

ऑनलाईन नंबरच लागेना : नागपूरच्या काही भागात 12 व्या दिवशीही घरगुती गॅस सिलेंडरसाठी एजन्सी बाहेर तुफान गर्दी पाहायला मिळत आहे. गॅस सिलेंडरसाठी एचपीच्या गॅस गोडाऊनबाहेर पहाटे 5 वाजल्यापासून लोकांची गर्दी पाहायला मिळत आहे. ऑनलाईन नंबर लागत नसल्याने अनेक ग्राहक त्रस्त झाले आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेला "150 दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम e-Governance सुधारणा मोहीम" अंतर्गत कामगिरी पुरस्कारात तृतीय क्रमांक

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

उल्हासनगर महानगरपालिकेने राज्य शासनाच्या "150 दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम e-Governance सुधारणा मोहीम" अंतर्गत राबविण्यात आलेल्या कामगिरी मूल्यांकनात उल्लेखनीय यश संपादन करत राज्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल महानगरपालिकेच्या आयुक्त मा. सौ. मनीषा आव्हाळे यांना माननीय मुख्यमंत्री यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



या यशाबद्दल आयुक्त मा. सौ. मनीषा आव्हाळे यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करत, "ही कामगिरी संपूर्ण टीमच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे. '150 दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम e-Governance सुधारणा मोहीम' यशस्वीपणे राबविण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत. यापूर्वी '100 दिवस कार्यालय सुधारणा कार्यक्रम' मध्ये मिळालेल्या प्रथम क्रमांकानंतरही आम्ही सुधारणा सुरू ठेवली असून, भविष्यातही नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद सेवा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत," असे सांगितले.

राज्यातील विविध महानगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ई-गव्हर्नन्स प्रणालीचा प्रभावी वापर, नागरिकांना जलद, पारदर्शक व सुलभ सेवा पुरवणे, तसेच डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासन अधिक सक्षम बनवणे या उद्देशाने "150 दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम e-Governance सुधारणा मोहीम" राबविण्यात आली होती.

उल्हासनगर महानगरपालिकेने नागरिकाभिमुख उपक्रम राबवत ऑनलाइन सेवा वितरण, मालमत्ता कर व पाणी बिलांचे डिजिटल भरणे, तक्रार निवारणासाठी आधुनिक प्रणाली, तसेच विविध विभागांमध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून प्रशासन अधिक कार्यक्षम केले आहे. या सर्व बाबींमुळे महानगरपालिकेची कामगिरी राज्यस्तरावर विशेष ठरली.

विशेष म्हणजे, सन २०२५ मध्ये देखील उल्हासनगर महानगरपालिकेने माननीय मुख्यमंत्री यांच्या "100 दिवस कार्यालय सुधारणा कार्यक्रम" अंतर्गत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला होता. या सलग यशामुळे महानगरपालिकेची कार्यक्षमता व प्रशासनातील सातत्यपूर्ण सुधारणा अधोरेखित होत आहे.

महानगरपालिकेच्या या यशामुळे शहराच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून, नागरिकांना अधिक दर्जेदार व डिजिटल सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्रात १ एप्रिलपासून वीजदरात कपात



■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यातील लाखो वीज ग्राहकांसाठी दिलासादायक बातमी असून, येत्या १ एप्रिलपासून वीजदरात कपात लागू होणार आहे. १०० युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या घरगुती ग्राहकांसाठी प्रति युनिट दरात सुमारे एक रुपयाची कपात करण्यात आली असून, आता त्यांना ८.१४ रुपयांऐवजी ७.१० रुपये मोजावे लागणार आहेत. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने महावितरणच्या पाच वर्षांच्या वीजदर कपात याचिकेला मंजुरी दिल्याने हा मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या वर्षभरापासून ही याचिका न्यायालयीन प्रक्रियेत अडकली होती. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेर्शांनुसार, तांत्रिक बाबींची पूर्तता करून आयोगाने आता नवा आदेश प्रसिद्ध केला आहे. या निर्णयामुळे आगामी पाच वर्षात टप्प्याटप्प्याने वीजदर कमी होणार आहेत. नवीन दरपत्रकानुसार, घरगुती ग्राहकांसाठी १०० ते ३०० युनिटपर्यंतचा दर १३.२३ रुपयांवरून १२.९४ पैसे इतका कमी झाला आहे. औद्योगिक ग्राहकांसाठीही दिलासा मिळाला असून, त्यांचा दर १०.८८ रुपयांवरून १०.७१ पैसे करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, छतावरील सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या ग्राहकांच्या सवलती महावितरणने कायम ठेवल्या आहेत. दरम्यान, पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना देण्यासाठी आयोगाने ई-वाहन चार्जिंग स्टेशनसाठी २०२६-२७ या वर्षासाठी ९.५० रुपये प्रति युनिट दर निश्चित केला आहे. हा दर २०२८-२९ पर्यंत स्थिर राहणार आहे. यामुळे मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांना आपल्या आवारात लघुदाब चार्जिंग केंद्र सुरू करणे अधिक परवडणारे होणार आहे.

पाच वर्षांचे वीजदर (प्रति युनिट रुपयांत)

वापर (युनिट)	२०२५-२६	२०२६-२७	२०२७-२८	२०२८-२९	२०२९-३०
०-१००	८.१४	७.१०	७.००	६.२०	६.००
१०१-३००	१३.२३	१२.९४	१२.७९	१२.६२	१२.६२
३०१-५००	१७.७८	१७.३५	१७.२७	१६.३८	१६.३५
५०० पेक्षा जास्त	१९.२३	१९.१४	१९.०४	१८.४७	१८.४७.

मुंबईत ४० जणांना हवंय इच्छामरण

देशातील हरीश राणाच्या पहिल्या प्रकरणानंतर बीएमसी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर

■मुंबई। प्रतिनिधी,

देशाच्या न्यायव्यवस्थेत अत्यंत संवेदनशील आणि ऐतिहासिक ठरणारा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. सुमारे १३ वर्षांपासून कोमात असलेल्या ३२ वर्षीय हरीश राणा यांना 'निष्क्रिय इच्छामरण' देण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दिली. न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला होता.

दरम्यान, हा निर्णय देताना न्यायालयातील वातावरण अतिशय भावूक झाले होते, तर या निर्णयानंतर देशभरातून अनेक प्रतिक्रियाही उमटल्या असतानाच या संदर्भात मुंबईतून एक मोठी बातमी पुढे आली आहे. त्यानुसार एकट्या मुंबईत ४० जणांना इच्छामृत्यू हवा असल्याची वृत्त आहे.

अर्जांची डिजिटल नोंद करण्यासाठी पोर्टल

देशातल्या हरीश राणाच्या



पहिल्या इच्छामरणानंतर मुंबईतही त्यासाठी आग्रही असलेल्यांची मोठी संख्या असल्याचे एक कठोर सत्य समोर आले आहे. मुंबई महापालिकेने विविध प्रभागांतील मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे इच्छामरणासंदर्भात अर्ज स्वीकारण्याची जबाबदारी दिली आहे. पालिकेकडे आत्तापर्यंत ४० जणांनी इच्छामरणासाठी अर्ज सादर केले आहेत. मात्र, यासंदर्भात कोणतीही सुस्पष्टता नसल्याने या अर्जांचे पुढे काय? असा पेच निर्माण झाला आहे. अशा अर्जांची डिजिटल नोंद करण्यासाठी सरकारच्या शहरी विकास विभागाने पोर्टल तयार केलेय आहे. मात्र, अद्याप महापालिका स्तरावर त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याचे पुढे आले आहे.

वैद्यकीय देखरेखीखाली टप्प्याटप्प्याने लाइफ सपोर्ट काढली

हरीश राणा २०१३ साली चंदीगडमध्ये विद्यार्थी असताना एका इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडला होता. या अपघातात त्याच्या मेंदूला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर तो 'व्हेजिटेटिव्ह स्टेट'मध्ये गेला आणि गेली १३ वर्षे कोमात होता. त्याच्या मेंदूतील नसाही दबल्या व सुकल्या होत्या आणि त्याचे जीवन पूर्णपणे लाइफ सपोर्ट आणि फीडिंग ट्यूबवर अवलंबून होते.

मुलाची ही अवस्था पाहून त्याच्या वृद्ध पालकांनी न्यायालयात त्याचे लाइफ सपोर्ट काढण्याची परवानगी मागितली होती. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात म्हटले की, एखाद्या व्यक्तीला अनंत काळ अशा अवस्थेत ठेवणे मानवी दृष्टिकोनातून योग्य नाही. तसेच न्यायालयाने दिल्लीतील एम्स रुग्णालयाला हरीश राणा यांना दाखल करून घेण्याचे निर्देश दिले असून वैद्यकीय देखरेखीखाली त्यांचे लाइफ सपोर्ट टप्प्याटप्प्याने काढण्याची प्रक्रिया पार पाडली जाईल.

हरीशच्या पालकांचे न्यायालयाकडून कौतुक

हा निर्णय देताना न्यायालयाने हरीशच्या पालकांच्या १३ वर्षांच्या संयम, धैर्य आणि समर्पणाचे विशेष कौतुक केले. हा निर्णय केवळ कायद्याचा नसून प्रेम, वैद्यकीय विज्ञान आणि मानवी संवेदना यांचा संगम असल्याचे न्यायालयाने नमूद केलं.

जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

महिलांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करत गावातील परिस्थितीची गंभीरता मांडली. जिल्हाधिकाऱ्यांच्या सहाय्यकांनी निवेदन स्वीकारत या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल, असं आश्वासन दिलं.

दारूमुळे कुटुंब उद्ध्वस्त

गावातील महिलांनी सांगितलं की, पुरुष आणि तरुण सायंकाळ झाली की दारू पिण्यासाठी, पार्टी करण्यासाठी बाहेर पडतात. इतकंच नाही तर त्यांना घरातील धान्य, वस्तू विकूनही दारू पिण्याची सवय लागली आहे. दारू पिऊन घरी आल्यावर महिलांना मारहाण केली जाते, भांडणं होतात आणि घरात तणावाचं वातावरण निर्माण होतं.

महिलांवर वाढला ताण

पुरुष दारूच्या आहारी गेल्यामुळे ते शेतात जात नाहीत, तसेच कामालाही जात नाहीत. त्यामुळे शेतातील सगळी कामं करण्याची वेळ महिलांवर आली आहे. घर आणि शेती दोन्ही सांभाळताना महिलांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

बेकायदेशीर विक्रीमुळे वाढलं संकट

गावात सरकारी दारू दुकान सुरू झाल्यापासून आणि इतर दुकानांतूनही बेकायदेशीर मद्यविक्री वाढल्यामुळे तरुण पिढी व्यसनाधीन होण्याचा धोका वाढला आहे, असंही महिलांनी निवेदनात नमूद केलं.


लग्नासाठी मुली नाकारल्या

दारूमुळे गावाची प्रतिमा खराब झाली असून बाहेरील गावांतील लोक आता आपल्या मुली या गावात देण्यास नकार देत आहेत. गावातील दारू बंद करा, मगच आम्ही मुली देतो असा निरोप बाहेरच्या गावातील लोकांकडून येतो. त्यामुळे अनेक तरुणांची लग्नंही होत नसल्याचं चित्र आहे. याचा सामाजिक स्तरावरही गावाला मोठा फटका बसत असल्याचं महिलांनी सांगितलं.

दारूमुळं गाव बिघडलं!

दारू दुकान बंद करा, नाहीतर लग्नंही होणार नाहीत

महिलांचा संताप, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



■बेळगाव। प्रतिनिधी,

सौंदत्ती तालुक्यातील चचडी गावातील पुरुष आणि तरुण मंडळी दारूच्या आहारी गेल्यामुळे संपूर्ण गावाचं वातावरण बिघडलं असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, इतर गावातील लोक आता 'दारू दुकान बंद करा, मगच मुलगी देतो' असं स्पष्ट सांगत असल्याने अनेकांची लग्नंही होत नाहीत. त्यामुळे आता गावातील महिलांचा संताप अनावर झाल्याचं दिसून आलं. याच पार्श्वभूमीवर चचडी गावातील महिलांनी मोठ्या संख्येने एकत्र येत गावातील दारू दुकान तात्काळ बंद करावी आणि इतर दुकानांमधून सुरू असलेली बेकायदेशीर मद्यविक्री थांबवावी, अशी जोरदार मागणी केली आहे.

पुण्यात स्वदेशी 'डिजिटल हवामान निरीक्षण प्रणाली' विकसित

अचूक अंदाजांना मिळणार वेग



■पुणे। प्रतिनिधी,

हवामान निरीक्षण क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल टाकत भारतीय हवामान विभागाने पुणे वेधशाळेत पूर्णपणे स्वदेशी बनावटीची 'डिजिटल सरफेस मेट्रोलॉजिकल ऑब्झर्व्हेशन सिस्टम' विकसित केली आहे. या अत्याधुनिक प्रणालीमुळे हवामान अंदाजाच्या वेग आणि अचूकतेत मोठी सुधारणा होणार असून, रिअल-टाइम डेटा उपलब्ध होणार आहे.

"सध्या वेधशाळांमध्ये दर तीन तासांनी मॅन्युअल नोंदी घेतल्या जातात, तर स्वयंचलित हवामान केंद्रांकडून दर १५ मिनिटांनी माहिती मिळते. मात्र, नवीन प्रणालीमुळे सातत्याने आणि अधिक सविस्तर माहिती संकलित होणार असल्याने हवामान अंदाज अधिक वेगाने आणि अचूकपणे वर्तवता येईल."

-एस. डी. सानप, शास्त्रज्ञ आयएमडी

जागतिक हवामान दिनानिमित्त भारतीय हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांच्या हस्ते या प्रणालीचे आभासी उद्घाटन करण्यात आले. पुण्यातील 'वेदर रिसर्च अँड सर्व्हिसेस' विभागाने ही यंत्रणा विकसित केली आहे. पारंपरिक पद्धतींच्या तुलनेत ही डिजिटल प्रणाली दर मिनिटाला हवामानाची नोंद घेऊ शकते. त्यामुळे वातावरणातील बदलांचे सतत आणि सूक्ष्म निरीक्षण शक्य होणार आहे. या यंत्रणेत प्रगत सेन्सर्स आणि वायरलेस तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून तापमान, आर्द्रता, हवेचा दाब, वाऱ्याचा वेग व दिशा तसेच पावसाचे प्रमाण यांची माहिती तत्काळ मिळणार आहे.

या प्रणालीत जिओ-टॅगिंगची सुविधाही देण्यात आली असून, स्थानिक पातळीवरील हवामानाचे अचूक विश्लेषण करणे सुलभ होणार आहे. त्यामुळे सूक्ष्म स्तरावर अधिक विश्वासार्ह अंदाज वर्तवता येतील. पुण्यातील यशस्वी प्रयोगानंतर ही प्रणाली पुढील दोन ते तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने देशभर लागू करण्याची योजना भारतीय हवामान विभागाने आखली आहे. यामुळे देशभर उच्च-वारंवारतेचे डिजिटल हवामान निरीक्षण नेटवर्क तयार होऊन हवामान खात्याच्या कार्यक्षमतेत मोठी भर पडेल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

१०० जहाजे भारताकडे रवाना

ऑल इंडिया पेट्रोल पंप असोसिएशनच्या प्रवक्त्यांची माहिती



■पुणे। प्रतिनिधी,

इराणने भारतासह पाच देशांच्या जहाजांना इंधन वाहतुकीसाठी स्ट्रेट ऑफ होर्मुझमधून जाण्याची अधिकृत परवानगी दिली आहे. इराणकडून गुरुवारी दुपारी १२.३० वाजता ही परवानगी मिळाल्याने भारताचा इंधन पुरवठा आता पूर्वपदावर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, त्यामुळे येत्या १० ते १५ दिवसांत देशातील परिस्थिती पूर्णपणे सुरळीत होईल, अशी माहिती ऑल इंडिया पेट्रोल पंप असोसिएशनचे प्रवक्ते अली दारूवाला यांनी दिली आहे.

देशात पेट्रोल, डिझेलचा पुरेसा, किंबहुना सरप्लस साठा

देशातील इंधन साठ्याबाबत स्पष्टीकरण देताना दारूवाला यांनी सांगितले की, भारतामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा, किंबहुना सरप्लस साठा उपलब्ध आहे. तसेच पेट्रोल, डिझेल, एलपीजी, सीएनजी आणि एलएनजीचा पुरवठा करण्यासाठी जवळपास १०० जहाजे भारताच्या दिशेने रवाना झाली आहेत. पुढील ९ ते १० दिवसांत हा पुरवठा देशात पोहोचणार आहे, असेही अली दारुवाला यांनी सांगितले.

६५ लाख सिलिंडरचे एक जहाज चेन्नईकडे

दरम्यान, भारताने आपल्या त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. इंधन पुरवठ्यातील अडथळ्यांचे मुख्य कारण तांत्रिक आणि आर्थिक आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर जहाजांच्या वाहतुकीचा खर्च वाढल्यामुळे सरकारला सध्या प्रति लिटरमागे ५० रुपयांचा मोठा फटका बसत आहे. हा तोटा कमी करण्यासाठी तेल कंपन्यांनी इंधन विक्रीला काही प्रमाणात निरुत्साहित करण्याचे धोरण अवलंबले आहे.

व्यापारी संबंधांचा वापर करून चीनकडे जाणारे ६५ लाख सिलिंडरचे एक जहाज चेन्नईकडे वळवले असून, त्याचे अनलोडिंग सुरू झाले आहे. साठेबाजी रोखण्यासाठी सध्या ऑटोमेशन सिस्टीममध्ये बदल करून ठराविक मयार्देपेक्षा जास्त इंधन देण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. देशात इंधनाचा कोणताही तुटवडा नसून, केवळ वाहतूक आणि आर्थिक नियोजनातील बदलांमुळे ही तात्पुरती समस्या निर्माण झाली आहे, जी लवकरच मार्गी लागेल असा विश्वास असोसिएशनने व्यक्त केला आहे.

कंपन्यांनी केली पेट्रोल पंप चालकांची उधारीची सवलत बंद

ग्रामीण भागातील पेट्रोल पंप बंद असण्यामागचे खरे कारण स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, तेल कंपन्यांनी पेट्रोल पंप चालकांना दिली जाणारी क्रेडिट लाईन म्हणजेच उधारीची सवलत अचानक बंद केली आहे.आता पंप चालकांना इंधनासाठी आगाऊ पैसे भरावे लागत आहेत. अनेक पंप चालकांचे भांडवल हे ग्राहकांकडील उधारीमध्ये अडकलेले असल्याने, एका रात्रीत मोठा निधी उभा करणे त्यांना शक्य झालेले नाही. ज्यांनी आगाऊ रक्कम भरली आहे, त्यांनाच इंधन पुरवले जात आहे. परिणामी, ७० टक्के पेट्रोल पंप सध्या ड्राय किंवा बंद अवस्थेत दिसत आहेत. तसेच, रामनवमीच्या सुट्टीमुळे बँका बंद असल्यानेही पैसे भरण्यात अडचणी आल्या, ज्यामुळे ग्रामीण भागांतील ५० ते ६० टक्के पंप बंद राहिले आहेत.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

या वास्तवाची जाणीव ठेवलेली बरी...



प्रदूषणाने निर्माण केलेल्या आरोग्य समस्यांमुळे देशातील सरासरी आयुर्मानसुद्धा पाच वर्षांनी घटल्याचे काही अभ्यास कानीकपाळी ओरडून सांगत असले, तरी सरकार व नागरिकांचेही डोळे उघडण्यास त्यांना अद्याप यश आलेले नाही, हे दुर्दैव!

जगभरात सर्वाधिक हवाप्रदूषण असलेल्या देशांच्या क्रमवारीत भारताचा क्रमांक सहावा असल्याचा निष्कर्ष देशातील शहरांच्या घुसमटलेल्या वस्तुस्थितीचा निदर्शक आहे. 'आय क्यू एअर' या स्विस कंपनीने सादर केलेल्या सन २०२५ च्या जागतिक हवा गुणवत्ता अहवालामध्ये जागतिक क्रमवारीत भारत तिसऱ्या स्थानावरून सहाव्या स्थानावर घसरल्याचा आनंद मानायचा, की जगातील तिसरी अर्थव्यवस्था होऊ पाहणाऱ्या महासत्तेला पाकिस्तान, बांगलादेश, ताजिकिस्तान, चाड आणि काँगो अशा देशांच्या पंक्तीत बसवल्याचा खेद; हे ज्याचे त्याने ठरवावे. पर्यावरण आणि आरोग्यासाठी सर्वाधिक घातक असलेल्या अतिसूक्ष्म धूलिकणांचे (पीएम २.५) भारतातील प्रमाण हे जागतिक आरोग्य संघटनेच्या मापदंडापेक्षा दहा पट अधिक आहे, जगातील सर्वांत प्रदूषित शहरांमध्ये भारत, पाकिस्तान आणि चीनमधील अनेक शहरे आहेत आणि गेल्या तीन वर्षांतील तुलनेने स्वच्छ हवा असली, तरी प्रदूषणाच्या प्रमाणात जगातील पहिल्या दहा देशांमधील आपले स्थान कायम आहे. हवेचे प्रदूषण, हा फक्त हिवाळ्यात कोंडलेल्या दिल्लीच्या वार्ता ऐकण्यापुरता विषय राहिलेला नसून घरादारांत, रस्त्यारस्त्यांवर आणि खेडोपाडीसुद्धा नाकातोंडात शिरणारी धूळ, हे प्रत्येकाच्या अनुभवास येणारे वास्तव ठरले आहे. त्याचेच प्रतिबिंब या जागतिक अहवालात पुन्हा एकदा उमटले आहे. करोनामुळे सारे जग थांबल्याचा काळ सोडला, तर धूलिकणांने होणाऱ्या प्रदूषणाचा आलेख सतत धोकादायक पातळीवरच दिसतो. वाढते शहरीकरण, जीवघेणा धूर सोडणारी वाहने, ठिकठिकाणी सुरू असलेली बांधकामे-विकासकामे आणि त्यातून निर्माण होणारी धूळ आणि सिमेंटचे कण, जागोजागी साठणाऱ्या आणि जाळल्या जाणाऱ्या कचऱ्यातून होणारे प्रदूषण, कारखान्यांची धुराडी, शेतीत जाळले जाणारे पाचट आणि वीजकेंद्रांसह ठिकठिकाणी कोळशाचे ज्वलन, ही त्यामागील प्रमुख कारणे सर्वज्ञात आहेत. यंदाच्या या अहवालात उत्तर प्रदेशातील लोनी आणि आसाममधील बर्निहाट ही शहरे देशात सर्वाधिक प्रदूषित असल्याचे समोर आले आहे. सोबतच महाराष्ट्रातील सांगली, महाड, सोलापूर, जळगाव, मालेगाव आणि बेलापूरसारख्या शहरांतील 'पीएम २.५' चे प्रमाण धोकादायक असल्याचे हा अहवाल सांगतो. पुण्या-मुंबईत दररोज सिमेंटचेच श्वास घेणाऱ्या नागरिकांना तर अशा अहवालांचेही नवल नाही. देशातील हवा प्रदूषणामध्ये वाहनांचा वाटा २५ ते ३० टक्के, उद्योगांचा २० ते २५ टक्के, वीजनिर्मिती केंद्रांचा वाटा १५ ते २० टक्के असून कचरा जाळण्यामुळे होणारे हवेचे प्रदूषण १० ते २० टक्के आहे. हवेचे प्रदूषण ही केवळ पर्यावरणीय समस्या राहिलेली नसून, आरोग्यापुढील सर्वांत मोठ्या संकटांमध्ये त्याने स्थान मिळवले आहे. या विषारी हवेमुळे रक्तदाब, हृदयरोग, पक्षाघात, श्वसनमार्गातील निरनिराळे संसर्ग, मधुमेह, फुप्फुसांचे विकार आणि कर्करोगाच्या रुग्णांची संख्या वाढली असून, दर वर्षी काही लाख नागरिकांच्या अकाली मृत्यूस ते कारण ठरले आहे. प्रमुख शहरांमधील हवेचे प्रदूषण नियंत्रित ठेवण्यासाठी 'नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम' हाती घेण्यात आला; मात्र यथातथा अंमलबजावणीमुळे त्यातून फारसे काही हाती लागलेले नाही. या कार्यक्रमाअंतर्गत मुंबई-पुण्यासारख्या प्रमुख शहरांवरच लक्ष केंद्रित करण्यात येते. अन्य शहरांची निधी मिळवतानाही दमछाक होते. अनेक शहरांत त्या निधीचा वापरच होत नाही; झाला तरी झाडलोट-पाणी फवारण्यासारख्या कामचलाऊ उपाययोजनांसाठी होतो, असे आढळते. वाहनांचे प्रदूषण रोखणे किंवा औद्योगिक प्रदूषणाच्या कडक नियमांची अंमलबजावणी अशा मूळ उपाययोजनांकडे होणारा काणाडोळा, ही सर्वांत मोठी अडचण आहे. दीर्घकालीन उद्दिष्ट म्हणून भारताने सन २०७०पर्यंत ह्यनेट झिरोह्णची घोषणा केली आहे. त्यानुसार शाश्वत ऊर्जास्रोतांचा वापर वाढवणे, बॅटरी वाहनांना प्रोत्साहन या दिशेने वाटचाल सुरू आहे; मात्र सौरऊर्जेच्या निर्मितीतील वाढ आणि कोळशाचा वापर तीन टक्क्यांनी घटवण्यात यश असले, तरी आजही देशातील ७० टक्के वीजवापर हा कोळशावरच आधारित आहे. एका रात्रीत चित्र बदलणार नाही. ऊर्जासुरक्षा, गरीबी निर्मूलन , आर्थिक वाढ आणि प्रदूषण नियंत्रण अशा गुंतागुंतीच्या प्रश्नांमधून संतुलित पद्धतीने मार्ग काढावा लागेल. मात्र, या उपाययोजनांची गती वाढली नाही, तर 'पीएम २.५'च्या कणाकणाने आपण मृत्यूच्या अधिक निकट निघालो आहोत, या वास्तवाची जाणीव ठेवलेली बरी.

ऐसे कैसे झाले भोंदू।
कर्म करोनि म्हणती साधू।।
अंगा लावूनियां राख।
डोळे झांकुनी करिती पाप।।

अभंगातून संत तुकारामांनी विचारलेला जळजळीत सवाल आजच्या महाराष्ट्राच्या वास्तवाला थेट भिडणारा आहे. वैराग्याचे सोंग घेत, दैवी शक्तींचा आव आणणारे तथाकथित 'साधू' प्रत्यक्षात स्वार्थ, पाखंडीपणा आणि अनाचाराचे केंद्र बनत आहेत, हे कटू वास्तव वारंवार समोर येत आहे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या मूल्यांपासून ते शाहू-फुले-आंबेडकरांनी घडवलेल्या सामाजिक न्याय आणि प्रबोधनाच्या परंपरेपर्यंत विवेक, समता आणि तर्कशुद्धतेचा वारसा लाभलेल्या या पुरोगामी महाराष्ट्रात वाढलेले भोंदूबाबांचे जाळे ही सामाजिक अधोगतीची नांदी आहे.

नाशिकचा भोंदूबाबा कॅप्टन अशोक थोरात प्रकरणाने या संकटाचे भयावह स्वरूप उघड केले. महिलांचे लैंगिक शोषण, अत्याचार, ब्लॅकमेलिंग आणि आर्थिक लूट यांसारख्या आरोपांनी संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडले. मात्र, या घटनेचे गांभीर्य केवळ एका व्यक्तीच्या गुन्ह्यांपुरते मर्यादित नाही; ते एका व्यापक आणि चिंताजनक वास्तवाकडे बोट दाखवते. अशा भोंदूबाबांना मिळणारा सामाजिक स्वीकार, त्यांना लाभणारा राजकीय आश्रय आणि सामान्य माणसाच्या असुरक्षिततेचा घेतला जाणारा गैरफायदा, या सर्वांच्या संगनमताने उभा राहिलेला हा विकृत प्रकार आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ अंधश्रद्धेपुरता मर्यादित राहत नाही; तो समाजाच्या विवेकबुद्धी, नैतिकता आणि संस्थात्मक जबाबदारीची मूलभूत कसोटी ठरतो.

अंधश्रद्धा आणि विवेकाचा संघर्ष

महाराष्ट्रातील थोर साधू-संतांनी समाजप्रबोधन करताना अंधश्रद्धेवर कठोर प्रहार केले. महाराष्ट्राने देशाला अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा दिला. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी अंधश्रद्धेविरुद्ध लढा उभारला आणि त्यासाठी प्राणांची आहुती दिली. बदलत्या काळात अंधश्रद्धा गावखेड्यातील जादूटोण्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही. आधुनिक रूप धारण करून तिने समाजात शिरकाव केला आहे. चमत्कारिक उपचार, दैवी शक्ती, आध्यात्मिक मार्गदर्शन अशा आकर्षक शब्दांच्या आडून नव्या पिढीपर्यंतही तिचा प्रभाव पोहोचत आहे. सोशल मीडिया, व्हॉट्सॲप, यूट्यूब यांसारख्या माध्यमांनी या भोंदूपणाला एक प्रकारची वैधता आणि व्यापकता दिली आहे. या अंधश्रद्धेचा सर्वांत भीषण पैलू म्हणजे, ती केवळ आर्थिक फसवणुकीपुरती मर्यादित राहत नाही, तर मानवी प्रतिष्ठेवरही घाला घालते. विशेषतः माता-भगिनींचे शोषण, लैंगिक अत्याचार, मानसिक गुलामी यांसारख्या घटना वारंवार समोर येत आहेत. सामाजिक-आर्थिक अस्थिरता, आरोग्य समस्या, कौटुंबिक ताण, यांमुळे माणूस मानसिकदृष्ट्या असहाय्य होतो आणि अशा वेळी ''सर्व समस्यांवर सोपा उपाय'' देण्याचा दावा करणारा भोंदूबाबा त्याला सहज आकर्षित करतो. विज्ञान आणि तर्क यांच्याऐवजी अंधविश्वासावर आधारित उपाय अधिक सहज, जलद आणि 'आश्वासक' वाटू लागतात. याचा गैरफायदा अशोक खरातसारखे भोंदूबाबा घेतात. हे समाजासाठी अत्यंत धोकादायक आहे. म्हणूनच, अंधश्रद्धा निर्मूलनाचा लढा केवळ कायद्यापुरता मर्यादित ठेवून चालणार नाही. तो शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक जागृती यांच्या माध्यमातून अधिक व्यापक पातळीवर लढला पाहिजे. शाळा-कॉलेजांपासून ते माध्यमांपर्यंत तर्कशुद्ध विचारसरणी रुजवणे आणि भोंदूपणाचा सामाजिक बहिष्कार ही काळाची गरज आहे.

राजकारण आणि भोंदूगिरी

या प्रकरणातील सर्वांत गंभीर मुद्दा म्हणजे भोंदूबाबा आणि राजकीय व्यवस्थेतील संबंध. अशा व्यक्तींच्या दरबारात राजकीय नेत्यांची उपस्थिती, त्यांचे सार्वजनिक सन्मान, कार्यक्रमांना दिले जाणारे प्रोत्साहन, हे सर्व त्यांना सामाजिक वैधता प्रदान करते. राजकारण्यांसाठी हे समीकरण फायदेशीर ठरते. धार्मिक-भावनिक मुद्द्यांवर प्रभाव टाकून मतदारांवर पकड मजबूत करता येते. त्यांना भक्त नावाची व्होट बँक मिळते. दुसरीकडे, भोंदूबाबांना राजकीय संरक्षण आणि विस्ताराची संधी मिळते. यामुळे कायद्याची भीती कमी होते आणि गुन्हेगारीला अप्रत्यक्ष प्रोत्साहन मिळते. कॅप्टन अशोक खरात प्रकरणातही अशाच प्रकारच्या संबंधांमुळे कारवाईला विलंब झाला, हे आता समोर येऊ लागले आहे.

दुहेरी अन्याय

या प्रकरणातील महिलांवरील अत्याचार ही अत्यंत गंभीर बाब आहे. लैंगिक शोषण, मानसिक छळ, ब्लॅकमेलिंग या सर्व प्रकारांनी महिला केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिकदृष्ट्याही कमजोर होतात. परंतु याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे, महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या राज्य महिला आयोगासारख्या संस्थांच्या भूमिकेवर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह. जर अशा संस्थांच्या प्रमुखांचे भोंदूबाबांशी संबंध असतील किंवा त्यांनी पीडितांबाबत असंवेदनशील भूमिका घेतली असेल, तर पीडित महिलांना न्याय कुठे मिळणार? एकीकडे अत्याचार आणि दुसरीकडे संरक्षण यंत्रणेचे अपयश असा दुहेरी अन्याय पीडित महिलांवर होतो.

पोलीस आणि प्रशासनाची निष्क्रियता की संगनमत?

अशा प्रकारचे गुन्हे दीर्घकाळ सुरू राहतात, तेव्हा पोलीस आणि प्रशासनाची भूमिका प्रश्नांकित होते. जर माहिती नव्हती, तर गुप्तचर यंत्रणा अपयशी ठरते. जर माहिती असूनही कारवाई झाली नाही, तर तो दबाव किंवा संगनमताचा मुद्दा ठरतो. कायद्याचे राज्य टिकवण्यासाठी पोलीस यंत्रणेची स्वायत्तता आणि निष्पक्षता अत्यावश्यक आहे. परंतु राजकीय हस्तक्षेपामुळे ही स्वायत्तता बाधित होत असल्याचे अनेकदा दिसून येते.

श्रद्धेच्या आड लपलेले साम्राज्य

भोंदूबाबांचे साम्राज्य हे केवळ आध्यात्मिक नसते; ते आर्थिकदृष्ट्याही अत्यंत प्रभावी असते. ट्रस्ट, दान, जमीन व्यवहार, कार्यक्रम या सर्व माध्यमांतून प्रचंड पैसा गोळा केला जातो. या पैशाच्या वापराबाबत पारदर्शकता नसते. करचुकवेगिरी, मनी लाँड्रिंग, बेकायदेशीर गुंतवणूक या सर्व शक्यता तपासण्याची गरज आहे. अशा आर्थिक साम्राज्यांमुळे भोंदूबाबांचा राजकीय आणि सामाजिक प्रभाव आणखी वाढतो. भोंदूबाबांच्या कार्यक्रमांना मोठ्या प्रमाणावर उपस्थिती, त्यांना दिला जाणारा सन्मान हे सर्व त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक प्रभावाला बळ देतात.

हा तर महाराष्ट्राच्या आत्म्याचा संघर्ष



महाराष्ट्र एका निर्णायक टप्प्यावर उभा आहे. एका बाजूला शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा विवेकवादी, समताधिष्ठित विचार; तर दुसऱ्या बाजूला अंधश्रद्धा, भोंदूपणा आणि सामाजिक अधःपतन. हा संघर्ष केवळ विचारांचा नाही, तर महाराष्ट्राच्या आत्म्याचा आहे.

पुरोगामी महाराष्ट्राची खरी कसोटी


शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांच्या पुरोगामी महाराष्ट्राने सातत्याने अंधश्रद्धेविरुद्ध आणि समतेसाठी लढा दिला. आज या विचारांची खरी कसोटी आहे. जर समाज अजूनही भोंदूबाबांच्या मागे धावत असेल, तर आपण या वारशाला न्याय देत आहोत का? हा खरा प्रश्न आहे. राज्यातले अनेक विद्यमान व माजी मंत्री, राजकीय नेते अशोक खरातसारख्या भोंदूबाबाच्या पायावर लोळण घेत असल्याची छायाचित्रे महाराष्ट्र पाहतो आहे. या भोंदूबाबाच्या नादी लागून अघोरी विद्या, तंत्र मंत्र साधनेसाठी काही राजकीय लोकांनी बोटे कापून घेतल्याची चचार्ही राजकीय वतुर्ळात सुरू आहे. समाजमाध्यमांवर काही जणांचे बोटाला बँडेज लावलेले फोटोही फिरत आहेत. राज्यात सर्वदूर खरातसारखे अनेक भोंदू श्रद्धेची दुकाने उघडून दिवसाढवळ्या लोकांना फसवून त्यांची लूट आणि शोषण करत आहेत.

महाराष्ट्राचा आत्मा कोणता?

आज महाराष्ट्र एका निर्णायक टप्प्यावर उभा आहे. एका बाजूला शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा विवेकवादी, समताधिष्ठित विचार; तर दुसऱ्या बाजूला अंधश्रद्धा, भोंदूपणा आणि सामाजिक अधःपतन. हा संघर्ष केवळ विचारांचा नाही, तर महाराष्ट्राच्या आत्म्याचा आहे. जर आपण विवेकाचा मार्ग स्वीकारला, तर हा प्रदेश पुन्हा एकदा आपल्या पुरोगामी ओळखीला साजेसा ठरेल, अन्यथा 'पुरोगामी महाराष्ट्र' ही केवळ इतिहासातील संज्ञा बनून राहील. समाजाने, राज्यकर्त्यांनी आणि संस्थांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची हीच वेळ आहे. कारण हा प्रश्न केवळ एका भोंदूबाबाचा नाही, तर महाराष्ट्राच्या भवितव्याचा आहे.

मुलाच्या संगोपनासाठी वडिलांनाही सुट्टी मिळावी

आपल्या निकालामध्ये सर्वोच्च न्यायालयाने केवळ आईचाच विचार न करता वडिलांचाही विचार केला. पालकत्व हे काही एकट्या आईचे काम नाही. त्यामध्ये आईसोबतच वडीलही तितकेच महत्त्वाचे आहेत. मूल मोठे होत असताना त्याला आईसोबत वडिलांची सोबतही मिळाली पाहिजे. त्यातून त्या मुलाचे भावनिक आणि मानसिक भरणपोषण होत असते. यासाठीच कुटुंबात नवे अपत्य आल्यावर वडिलांना कामावरून रजा मिळण्यासाठी कायदे मंडळाने आवश्यक कायदा केला पाहिजे, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाने केली.



कायद्यातील तरतुदींच्या अधीन राहून न्याय देण्याचे काम न्यायालयांना करायचे असते. आपल्याकडे कायदा तयार करण्याचे काम राज्यघटनेने संसदेकडे किंवा विधिमंडळाकडे सोपविले आहे. यांनाच कायदेमंडळ असेही म्हटले जाते. जर यांनी तयार केलेले कायदे हे राज्यघटनेतील तरतुदींशी विसंगत असतील, तर ते रद्द करण्याचा अधिकार त्याच राज्यघटनेने सर्वोच्च न्यायालयाकडे दिला आहे. आपल्याकडे राज्यघटना सर्वोच्च आहे. म्हणजेच कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ यांच्याही वरच्या स्थानी भारताची राज्यघटना आहे. त्याच राज्यघटनेच्या संरक्षणाची जबाबदारी घटनाकारांनी सर्वोच्च न्यायालयाकडे सोपविली आहे. आपल्या याच जबाबदारीचे पालन करीत सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक निकाल दिला आणि संसदेने तयार केलेल्या सामाजिक सुरक्षा संहितेतील एक कलम नक्की कशा पद्धतीने अंमलात आणले पाहिजे, याबद्दल सविस्तरपणे विवेचन केले. आजच्या लेखात त्याबद्दलच समजून घेऊया.

सामाजिक सुरक्षा संहिता, 2020 गेल्या वर्षीपासून अंमलात आली. या संहितेमध्ये सामाजिक सुरक्षेशी संबंधित आधीपासून अस्तित्त्वात असलेले सर्व कायदे एकत्रित करण्यात आले आहेत. याच संहितेत प्रसूतीनंतर महिलांना मिळणाऱ्या रजेसंबंधीचीही तरतूद आहे. त्यातील कलम 60 (4) नुसार कायदेशीर पद्धतीने तीन महिन्यांपर्यंत वय असलेल्या बाळाला दत्तक घेणाऱ्या आईला 12 आठवड्यांपर्यंत रजा मिळू शकते. ज्या दिवशी तिने बाळाला दत्तक म्हणून स्वीकारले, त्या दिवसापासून ही रजा अंमलात येते. जर दत्तक घेण्यात आलेले बाळ तीन महिन्यांपेक्षा जास्त वयाचे असेल, तर अशा बाळाला दत्तक घेतल्यानंतर संबंधित आईला कामावर रजा मिळण्याची कोणतीही तरतूद या संहितेमध्ये करण्यात आलेली नाही. संहितेतील याच तरतुदीला याचिकाकर्त्यांनी आक्षेप घेतला. म्हणजे दत्तक घेण्यात आलेल्या बाळाचे वय तीन महिन्यांपर्यंत असेल तर आईला तिच्या कामाच्या ठिकाणी 12 आठवडे रजा मिळणार. पण बाळाचे वय तीन महिन्यांपेक्षा जास्त असेल, तर रजा मिळणार नाही. सामाजिक सुरक्षा संहितेतील ही तरतूद राज्यघटनेतील अनुच्छेद 14 च्या विरोधात असल्याचे याचिकाकर्त्यांचे म्हणणे होते. ज्यावर सर्वोच्च न्यायालयाचे न्या. जे. बी. परडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने अतिशय सविस्तरपणे विश्लेषण करून निकाल दिला.

निकालाकडे जाण्यापूर्वी एखादा कायदा करताना त्यामध्ये अशा पद्धतीने विभागणी करता येते का, याकडे बघितले पाहिजे. राज्यघटनेतील अनुच्छेद 14 हा देशातील प्रत्येक नागरिकाला समानतेचा हक्क प्रदान करतो. कायद्यापुढे सगळे समान आहेत आणि कायद्याचे सगळ्यांना समान संरक्षण आहे. असा हक्क राज्यघटनेने दिला असला, तरी समाजात सगळे समान आहेत, असे होत नाही. समाजामध्ये असमानता राहतेच. ही असमानता कमी करण्यासाठी काही वेगळे कायदे किंवा तरतुदी कराव्या लागतात. मग त्या कशा करायच्या असा प्रश्न उरतो. ज्यावेळी असमानता कमी करण्यासाठी काही कायदे तयार केले जातात, त्यावेळी त्यामध्ये विस्तृत स्वरुपात नेमका आणि तर्कशुद्ध फरक असला पाहिजे. तसेच संबंधित कायद्याचे जे उद्दिष्ट आहे, त्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठी हा फरक करण्यात आलेला असला पाहिजे.

कायद्याने समाजातील एखाद्या समूहाला किंवा वर्गाला संरक्षण दिलेले असले, तरी हा समूह इतरांपेक्षा कशा पद्धतीने वेगळा आहे आणि त्याला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वेगळा कायदा करण्याची का गरज आहे, हे त्या कायद्याच्या तरतुदीतून दाखवून देता आले पाहिजे. तसे असेल तर अशा विभागणीला सर्वोच्च न्यायालय आक्षेप घेणार नाही. पण जर विभागणी तर्कशुद्ध नसेल, तर मग अशी विभागणी निश्चितपणे अनुच्छेद 14 मधील तरतुदीच्या विरोधात ठरते. अशावेळी सर्वोच्च न्यायालय त्यांना मिळालेल्या अधिकारांचा वापर करून असा कायदा घटनाबाह्य ठरवू शकते.

सामाजिक सुरक्षा संहितेमधील कलम 60 (4) मध्ये दत्तक मूल घेणाऱ्या काही मातांना प्रसूतीची रजा देण्याची तरतूद आहे. पण त्यामध्ये बाळाचे वय तीन महिने वापरून जी विभागणी करण्यात आली आहे, ती तर्कशुद्ध नाही. ही तरतूद संबंधित आईसोबत त्या बाळावरही अन्याय करणारी आहे. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने ही तरतूद घटनाबाह्य ठरवली आणि तीन महिन्यांपेक्षा जास्त वय असलेल्या बाळांना कायदेशीर पद्धतीने दत्तक घेतल्यानंतरही संबंधित आईला 12 आठवड्यांची प्रसूती रजा देण्याचा निकाल दिला.

कोणताही निकाल देताना या विषयाशी संबंधित सर्वच कायद्यांचा विचार न्यायालयांना करावा लागतो. या खटल्यामध्येही राज्यघटनेसोबतच बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा, 2015 तसेच दत्तक नियमावली, 2022 (कारा) यांचाही विचार करावा लागला. बाल न्याय कायद्याच्या कलम 2 (9) मध्ये 'मुलाचे चांगले हित' याची सविस्तर व्याख्या देण्यात आली आहे. या व्याख्येनुसार, मुलासंबंधी निर्णय घेताना त्याचे हक्क, गरजा, सामाजिक कल्याण, शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकास याचा विचार करूनच निर्णय घेतला पाहिजे. असा निर्णय मुलाच्या चांगल्या हिताचा असू शकतो, असे वर्णन आहे. या कायद्यातील कलम 3 मध्ये हा कायदा अमलात आणताना सर्व अधिकाऱ्यांनी मुलाचे चांगले हित बघूनच निर्णय घेतले पाहिजेत, अशी तरतूद करण्यात आली आहे. म्हणजेच आधी दिलेल्या व्याख्येनुसार निर्णय घेतले पाहिजेत. दत्तक नियमावलीमध्येही मुलाचे चांगले हित हेच सर्वोच्च स्थानी ठेवून दत्तक देण्यासंदर्भातील सर्व निर्णय घेतले गेले पाहिजे, असे म्हटले आहे. म्हणजे या नियमावलीतही मूलाचे हित महत्त्वाचे आहे.

तीन महिन्यांपेक्षा जास्त वय असलेल्या मुलाला आईच्या सोबतीची गरज नसते, असे होत नाही. जरी असे मूल दत्तक घेतलेले असले, तरी आई आणि संबंधित मूल यांच्यातील नाते फुलण्यासाठी दोघांना एकमेकांची पुरेशी सोबत मिळणे आवश्यक आहे. आईला आपल्या कामातून वेळच काढता आला नाही, तर अशी सोबत मिळूच शकत नाही. त्यामुळे त्यातून बाळाचे हित साधलेच जाऊ शकत नाही, याचाही विचार सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना केला.

आपल्या निकालामध्ये सर्वोच्च न्यायालयाने केवळ आईचाच विचार न करता वडिलांचाही विचार केला. पालकत्व हे काही एकट्या आईचे काम नाही. त्यामध्ये आईसोबतच वडीलही तितकेच महत्त्वाचे आहेत. मूल मोठे होत असताना त्याला आईसोबत वडिलांची सोबतही मिळाली पाहिजे. त्यातून त्या मुलाचे भावनिक आणि मानसिक भरणपोषण होत असते. पण वडिलांना घर चालविण्यासाठी कुटुंबीयांपासून रोज लांब जावे लागते आणि ते आपल्या मुलाला केवळ सुट्टीच्या दिवशी वेळ देऊ शकतात, हे योग्य नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. एकतर प्रसूतीनंतर किंवा मूल दत्तक घेतल्यानंतर वडिलांना रजा मिळण्याची तरतूद नसल्यामुळे आपल्याकडे मुलांचे संगोपन म्हणजे आईचेच काम अशी मानसिकता तयार झाली आहे, त्याला बळ मिळते आणि दुसरे म्हणजे जरी मुलाचे संगोपन करण्याची वडिलांची तयारी असली, तरी रजेची तरतूद नसल्यामुळे ते कामावरून सुट्टी घेऊच शकत नाहीत.

यासाठीच कुटुंबात नवे अपत्य आल्यावर वडिलांना कामावरून रजा मिळण्यासाठी कायदे मंडळाने आवश्यक कायदा केला पाहिजे, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाने केली. एक प्रकारे या सूचनेतून न्यायालयाने पुन्हा एकदा घटनेतील अनुच्छेद 14 नुसार समानतेच्या तत्त्वाचाच पुरस्कार केला. मुलाच्या संगोपनामध्ये आई आणि वडील दोघांनाही समान महत्त्व असले पाहिजेत. आईकडे ठराविक चष्म्यातून आणि वडिलांकडे ठराविक चष्म्यातून बघण्याची मानसिकता कायद्याच्या माध्यमातून दूर केली पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या या निकालातून दाखवून दिले. आता संसद या संदर्भात कायदा करेल का, कधी करेल, हे बघावे लागेल. पण या निमित्ताने हा विषय चर्चेत आला आणि सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात अधिकारवाणीने निकाल दिला हेही नसे थोडके!

कचरा न्यूनतम करा!



मुंबईजवळील ठाणे महानगरपालिकेने शहराच्या कचरा व्यवस्थापनासाठी 'इन्सिरेशन' तंत्रज्ञान, म्हणजे कचरा जाळून नष्ट करण्याचे तंत्रज्ञान वापरून कचराभूमीवर न्यूनतम कचरा राहील, असा प्रकल्प विकसित केला आहे. या तंत्रज्ञान पद्धतीत कचरा उच्च तापमानावर जाळला जाऊन त्यातून निघणारा धूर आणि वायू शुद्ध केले जातात अन् राखेची सुरक्षित विल्हेवाट लावली जाते. याचा लाभ असा आहे की, ७० ते ८० टक्के कचरा जाळला गेल्याने कचराभूमीचा वापर न्यून होतो, रोगजंतू पूर्ण नष्ट होतात आणि यातून ऊर्जानिर्मिती करता येते. यातून २४ मेगावॅट वीजनिर्मिती होण्याची अपेक्षा आहे. सध्या या प्रकल्पाचे दुष्परिणाम अल्प दिसत आहेत. 'कचऱ्यातून ऊर्जा' या नावाचा हा प्रकल्प राज्यातील सर्वांत मोठ्या प्रकल्पापैकी एक आहे. हा खर्चिक प्रकल्प यशस्वी ठरला, तर पुढे इतरत्रही त्याचे अनुकरण केले जाऊ शकते; मात्र सध्यातरी विविध शहरांतील घनकचरा व्यवस्थापनाची स्थिती सुधारण्यास पुष्कळ मोठा वाव आहे. सध्या भारतात ३७ टक्के लोक शहरात रहातात. वर्ष २०३० पर्यंत हे प्रमाण ४० आणि वर्ष २०५० पर्यंत ५० टक्के होऊ शकते. प्रचंड लोकसंख्येमुळे शहरातील सर्व सुविधांप्रमाणेच सर्वांत मोठा ताण येतो, तो कचरा व्यवस्थापनावर! शहरातील सर्व कचरा एकत्र करून एका ठराविक भूमीवर टाकण्यात येतो. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे दायित्व शहरातील सर्व कर्चयाची विल्हेवाट लावण्याचे असले, तरी वाढत्या लोकसंख्येमुळे उपनगरांमध्ये 'कचराभूमी' ठिकठिकाणी निर्माण करावी लागत असल्याने आता विविध वाद वाढत चालले आहेत. मुंबईतील सर्वांत मोठ्या देवनारसारख्या 'डंपिंग ग्राऊंड' म्हणजे कचरा साठवण्याच्या जागेच्या आजूबाजूच्या २ कि.मी. परिसरात गेले, तरी असह्य घाण वास येणे चालू होते. मागील वर्षी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार मुंबईतील देवनार डंपिंग ग्राऊंडवर ४० मजले उंच एवढा कचरा साठल्याने ही जागा भारतातील सर्वोच्च प्रमाणात 'मिथेन' हा विषारी वायू उत्पन्न करणाऱ्या २२ जागांपैकी एक बनली आहे. प्रतिघंटा ६ सहस्र २०० किलो ज्वलनशील वायू येथून बाहेर पडतो, जो अत्यंत हानीकारक असल्याने येथील लोकांच्या आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. मागील वर्षीपासून त्याचे 'बायोमायनिंग' (जैवउपचार) चालू करण्यात आले आहे. यात पूर्वापार चालत आलेल्या कचरा टाकण्याच्या भूमीतील सूक्ष्म कचऱ्याचे विभाजन आणि विघटन करून त्या जागा मोकळ्या केल्या जातात. तेथील तांत्रिक कचरा वेगळा करून दुसरीकडे नेला जातो आणि जैविक कचरा कुजवून भूमी सुपीक केली जाते. अशा प्रकारे देवनारची कचराभूमी मोकळी होण्यास ३ वर्षे तरी लागतील. असे प्रकल्प महाराष्ट्रात नागपूरसह ७ ठिकाणी राबवले जात आहेत. देशभरात ५५० हून अधिक ठिकाणी या प्रकारचे काम चालू असलेले पहाता या प्रगत राज्यातील आकडेवारीची ही संख्या अत्यल्पच म्हणावी लागेल. आपल्याकडे साधे ओल्या आणि सुक्या कचऱ्याच्या वर्गीकरणाचे सूत्र घेतले, तर अजूनही भारतातील बहुसंख्य जनता त्याचे विभाजनच करत नाही, असे लक्षात येते. देशभरात हे विभाजन होण्याचे प्रमाण २० टक्क्यांपासून ९० टक्क्यांपर्यंत एवढे विविधांगी आहे. कर्चयाचे वर्गीकरण हाच कर्चयाच्या विघटनातील प्रथम टप्पा असतो; परंतु तेच भारतात काटेकोरपणे होत नाही. भारतात यासाठी कडक कायदे आणि उपाययोजना नाहीत; त्यामुळे नागरिकांना शिस्त नाही, असे दुर्दैवाने म्हणावे लागते.

जाणून घ्या टिकली लावल्याने होणारे फायदे



टिकलीचाही महिलांच्या १६ शृंगारांमध्ये समावेश असून सौभाग्यवती महिला काही वर्षांपूर्वी कुंकवाचा वापर करत असत. पण कुंकवाचा वापर न करता टिकलीचा वापर सध्या महिलावर्ग मोठ्या प्रमाणात करताना पाहायला मिळतात. महिला चेहऱ्यावर लावण्यात आलेल्या टिकलीमुळे केवळ सुंदरच दिसत नाहीत तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. टिकलीचा वापर सामान्यतः महिला ट्रेंडिशनल लूकसाठी करतात. पण एका अभ्यासानुसार आरोग्यालाही टिकलीमुळे अनेक फायदे होतात. यामुळेच टिकलीचा वापर अनेक महिला करत आहेत. एवढेच नाही तर वेस्टर्न कपडे परिधान करणाऱ्या महिलाही आपल्या ड्रेसनुसार कलरफुल टिकली वापरण्यास सुरुवात करत आहेत. चेहऱ्यावरील टिकलीमुळे महिला खुपच सुंदर दिसतात आणि त्यामुळे अनेक आरोग्यदायी फायदेही होतात. कपाळावर टिकली लावण्याने अनेक फायदे होतात.

कपाळावर टिकली लावल्यामुळे डोके दुखणे बंद होते. ॲक्युप्रेशर शास्त्रानुसार कपाळावर ज्या ठिकाणी टिकली लावण्यात येते, त्या जागेवर मसाज केल्यास डोकेदुखी तत्काळ बंद होते. टिकली लावलेल्या जागेवर मसाज केल्यास नाकाच्या आसपास ब्लड सर्क्युलेशन चांगल्या पद्धतीने होण्यास सुरुवात होते, ज्यामुळे तुम्हाला खूपच आराम मिळतो.

टिकली दोन्ही भुवयांच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, शरीरातील सर्व नसा त्याच केंद्रावर एकत्र येतात. टिकली लावण्यात येणाऱ्या या जागेला अग्निचक्र या नावाने सुद्धा ओळखले जाते. म्हणूनच टिकली लावल्याने एकाग्रताही वाढते आणि मन शांत राहते. तसेच, टिकली लावल्याने ताणतणावही कमी होतो.

तुम्हाला पूर्ण झोप मिळत नाही आणि त्यामुळे तुम्ही त्रस्त आहात तर टिकली लावणे तुमच्यासाठी खूपच फायदेशीर होऊ शकते. टिकली शरीरच्या वरच्या भागाला शांत ठेवण्यासाठी खूपच फायदेशीर ठरते. कपाळावर टिकली लावल्याने चांगली झोप येते.

टिकली डोळ्यांच्या नसा मजबूत करण्यास खूपच मदत करते. टिकली कपाळाच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, त्या ठिकाणच्या नसा आणि डोळ्यांमधील नसा यांच्यात एक कनेक्शन असते. टिकली डोळ्यांच्या नसांना मजबूत करण्यास मदत करते ज्यामुळे तुम्हाला एकदम स्पष्ट आणि साफ दिसण्यास मदत होते. एवढेच नाही तर टिकली लावल्याने आसपासचे मसल्स मजबूत आणि हेल्दी होतात.

तुमच्या चेहऱ्यावर जर सुरकुत्या पडण्यास सुरुवात होत आहे तर टिकली लावण्यास तुम्ही सुरुवात करा. कारण, टिकली लावल्याने चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्यांपासून सुटका मिळण्यास मदत होते.

कैरीची आंबट-गोड कढी



साहित्य :
कैरी - 1,ओलं खोबरं - 4 वाटी, गूळ - 1/2 वाटी, आलं-लसूण, हिरवी मिरची पेस्ट, मोहरी - 1/2 चमचा, मेथी दाणे - 1/2 चमचा, सुकी लाल मिरची - 1, हिंग - चिमूटभर, मीठ - चवीनुसार, कोथिंबीर

कृती :

- सगळ्यात आधी कैरी स्वच्छ करून घ्या आणि वाफेवर उकडून घ्या.
- सगळ्यात आधी कैरी स्वच्छ करून घ्या आणि वाफेवर उकडून घ्या.
- आता वाटणात हवे तेवढे पाणी घाला, जास्त पातळ करू नका.
- यानंतर त्यात आलं-लसूण, हिरवी मिरची पेस्ट, गूळ आणि चवीनुसार मीठ घालून एकजीव करा.
- यानंतर छोट्या कढईत तेल गरम करून त्यात मोहरी, मेथी दाणे आणि सुकी लाल मिरची घालून तडका द्या.
- सर्वात शेवटी हिंग घाला आणि कैरी नारळाचे मिश्रण घालून मिक्स करा.
- मिश्रण मंद आचेवर 5 मिनिटं शिजवा आणि सर्व्ह करताना कोथिंबीर घाला.
- तयार झाली आहे चटपटीत कैरीच्या कढीचा आस्वाद.

न्यूड मेकअप लूकसाठी काही टिप्स



न्यूड मेकअप लूकचा सध्या खूपच वापर केला जातो. यासाठी ब्लॅक मस्कराचा वापर करा. आपल्याला त्वचेला सूट होईल असा नैसर्गिक रंग आणि गुलाबी रंगाच्या लिप कलरचा वापर करा. आकर्षक दिसण्यासाठी न्यूड मेकअप लूकसाठी कोणत्या टिप्सचा वापर केला पाहिजे, ते जाणून घ्या.

- आपल्या डोळ्यांना नॅचरल लूक देण्यासाठी पापण्यांना ब्लॅक मस्करा लावा आणि केस कुरळे करा.
- डोळ्यावरच्या आतील कोपऱ्यापर्यंत काजळ लावा. त्यामुळे पापण्या सुंदर आणि आकर्षक दिसतील.
- गालावर नॅचरल चमक येण्यासाठी चीकबोन्सला हायलाइट करा. सध्या न्यूड मेकअप लूकसाठी आपल्या त्वचेला सूट होईल अशा नॅचरल शेडची निवड करा.
- यासाठी हलक्या रंगाचा वापर करा. चेहरा चमकण्यासाठी ओठांना हलक्या गुलाबी रंगाची पिंक शेडची लिपस्टिक लावून त्यावर शाईन येण्यासाठी लिप ग्लॉसचा वापर करा. त्यामुळे अजूनच आकर्षक लूक येईल.
- न्यूड मेकअप लूकसाठी एकाच रंगाच्या वेगवेगळ्या शेड्सचा वापर करा.
- न्यूड शेड्स लावण्याआधी लाईट बेस लावा आणि आवश्यक असल्यास हलक्या हातांनी लूज पावडर किंवा कॉम्पॅक्ट पावडर लावा.

गरम पाणी पिण्याचे फायदे

बहुतेक लोक आपल्या दिवसाची सुरुवात चहा किंवा कॉफीच्या गरमागरम कपाने करत असतात. काही लोकांना तर सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी मिळाली नाही, तर त्यांचा अख्खा दिवस वाईट जातो, इतकी त्यांना चहा किंवा कॉफीची सवय झालेली असते. पण या सवयीमुळे कालांतराने बद्धकोष्ठ, पोटदुखी, ॲसिडिटी, पिंपल्स अशा तक्रारी सुरू होतात. असे म्हटले जाते की त्वचा, केस आणि एकंदर शरीराचे आरोग्य सांभाळण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सकाळी उठल्या उठल्या एक ग्लास गरम पाणी पिण्याची सवयही तुमच्या शरीरातील अनेक विकार मुळापासून दूर करू शकते.

सकाळी उठून नियमितपणे एक ग्लास गरम पाणी प्यायल्याने पचन शक्ती चांगली राहते. तसेच गरम पाणी प्यायल्याने शरीरातील रक्ताभिसरणही चांगले राहते. आपल्या खाण्या-पिण्याच्या अयोग्य सवयींमुळे आपल्या शरीरामध्ये साठत असलेले घातक पदार्थ गरम पाण्याच्या सेवनामुळे बाहेर टाकण्यास मदत होते. तसेच गरम पाण्याच्या नियमित सेवनामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी घटण्यास मदत होऊन वजन कमी होण्यास मदत होते. योगशास्त्राच्या नियमानुसार तीन महिने गरम पाण्याच्या सेवनाने वजन कमी होऊ शकते. याकरिता इतर कोणतीही विशेष पथ्ये पाळण्याची गरज नाही.

काही लोकांना बद्धकोष्ठाचा त्रास होतो. अशा वेळी सकाळी रिकाम्यापोटी गरम पाणी पिणे फायदेशीर ठरू शकते. पुष्कळ महिलांना मासिक धर्माच्या दिवसांमध्ये डोकेदुखी सतावते. त्यावेळी नियमित गरम पाण्याचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून आराम मिळतो.



तसेच या दिवसांमध्ये होणारी पोटदुखी ही गरम पाण्याच्या सेवनामुळे कमी होते.

दररोज सकाळी एक ग्लास गरम पाण्यामध्ये थोडासा लिंबाचा रस घालून प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. ज्यांना सतत बारीकसारीक तब्येतीच्या तक्रारी जाणवत असतील त्यांनी गरम पाणी आणि लिंबाच्या रसाचे दररोज सेवन करणे उत्तम. यामुळे त्वचेचे आरोग्य देखील चांगले राहून, त्वचेवर पिंपल्स येणे कमी होते. तसेच गरम पाण्याच्या सेवनाने ॲसिडिटीचा त्रासही कमी होतो. पुष्कळ लोकांच्या खाण्या-पिण्याचे वेळापत्रक किंवा झोपेच्या वेळा अतिशय अनियमित असतात. शिवाय ज्या लोकांना काही ना काही कारणाने सतत प्रवास करावा लागतो. त्यांनाही बाहेरच्या जेवणावरच काम चालवून घ्यावे लागते. परिणामी ॲसिडिटीसारखे विकार पाठीमागे लागतात. अशा वेळी दररोज सकाळी गरम पाणी पिण्याच्या सवयीने ॲसिडिटीचे प्रमाण कमी होते.

मासिक पाळी पुढे ढकलताय?

सण, समारंभ, पर्यटन किंवा धार्मिक कार्याच्या आड येणारी मासिक पाळी पुढे ढकलण्याचा निर्णय अनेक महिला घेतात. मात्र अशा प्रकारे निसर्गचक्रात हस्तक्षेप करणं चुकीचं आहे. बरंच प्रबोधन होऊनही मासिक पाळीबाबतचे गैरसमज कमी झालेले नाहीत. म्हणूनच महिलांना कृत्रिम पद्धतीने पाळी पुढे ढकलावी लागते. मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. पण या गोळ्यांचे शरीरावर दीर्घकालीन परिणाम होतात.



- मासिक पाळी पुढे ढकलणाऱ्या गोळ्यांच्या सततच्या सेवनामुळे यासंदर्भातल्या नैसर्गिक चक्रावर परिणाम होऊ शकतो. शिवाय महिलांच्या प्रजननक्षमतेवरही याचे घातक परिणाम दिसून येतात.
- या गोळ्यांचं सेवन केल्यानंतर पुढचा काही काळ मासिक पाळीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होण्याची शक्यता वाढते. जवळपास २० टक्के महिलांना हा अनुभव येतो. पुढचे काही महिने मासिक पाळीतून अधिक प्रमाणात रक्त जाऊ शकतं.
- या गोळ्या बऱ्याच काळपर्यंत घेत राहिल्यास आरोग्यावर अत्यंत घातक असे परिणाम दिसून येतात. नसांमध्ये रक्ताची गुठळी होण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. या गोळ्यांमुळे इतर औषधांच्या शरीरावरच्या प्रभावावर विपरित परिणाम होऊ शकतो.
- या गोळ्या घेतल्यानंतर इतर काही दुष्परिणाम होऊ शकतात. जुलाब, हातापायांमध्ये गोळे येणं, अवेळी रक्तस्राव होणं हे दुष्परिणाम दिसून येऊ शकतात.

कोरफडीचे ५ गुणकारी फायदे

कोरफड त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. याच्या नियमित सेवनाने त्वचेसंबंधित अनेक समस्या दूर होतात. जाणून घ्या कोरफडीचे गुणकारी फायदे...

- सतत कॉम्प्युटरसमोर बसल्याने डोळ्यांवर ताण येतो. डोळ्यांचे आरोग्य चांगले राहाण्यासाठी दोन चमचे कोरफडीचा गर एक कप पाण्यात मिसळून त्याने डोळे धुवा. यामुळे डोळ्यांना आराम मिळेल.
- चेहऱ्यावर पुटकुळ्या आल्यास कोरफडीचा गर चेहऱ्यावर लावा. थोड्या वेळाने चेहरा साध्या पाण्याने धुवा. यामुळे पुटकुळ्या कमी होतील.
- शरीरावर कापल्यामुळे जखम झाली असल्यास त्यावर कोरफडीचा गर लावा.
- कोंड्याची समस्या असल्यास दोन चमचे कोरफडीचा गर कंडिशनरसोबत मिसळा. यामुळे कोंड्यापासून सुटका होईल.
- दातांच्या हिरड्या मजबूत करण्यासाठी हिरड्यांवर कोरफडीचा गर लावा.

रोज एक टोमॅटो खाल्ल्याने होतात अनेक फायदे



सॅलडमध्ये तसेच भाज्यांमध्ये टोमॅटोचा वापर केला जातो. मात्र तुम्हाला माहीत आहेत का रोज टोमॅटो खाण्याचे फायदे. ज्या आजारांवरील इलाज कठीण आहे, त्यावरही टोमॅटो गुणकारी आहे.

- हृदयासंबंधित रोगांपासून बचाव होतो.
- युरिन इन्फेक्शनपासून बचाव तसेच रक्तशुद्धी होते.
- पचनशक्ती वाढते. पालकाच्या रसात टोमॅटोचा रस मिसळल्याने बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.
- टोमॅटोमध्ये असलेल्या व्हिटॅमिन 'के'मुळे हाडे मजबूत होतात. तसेच बोन टिश्यू रिपेअर होण्यास मदत होते.
- अँटीऑक्सिडंटचे भरपूर प्रमाण असलेल्या टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन 'सी' आणि 'ए' असते. व्हिटॅमिन 'ए' डोळ्यांसाठी तसेच डिहायड्रेशनसाठी चांगले.
- केसांना चमकदार तसेच मजबूत बनवण्यासाठीही टोमॅटो फायदेशीर आहे.
- त्वचेला उजाळा मिळवून देण्यासाठी टोमॅटो खाणे चांगले.
- बिया नसलेल्या टोमॅटोचा सॅलडमध्ये वापर केल्यास किडनी स्टोनची शक्यता कमी होते.
- प्रतिकारक्षमता वाढते. तसेच तणावापासून दूर रोखण्यासाठीही टोमॅटो लाभदायक आहे.
- स्मोकिंगमुळे शरीराला होणाऱ्या नुकसानापासून वाचण्यासाठीही टोमॅटोचे सेवन फायदेशीर ठरते.



तुम्ही झोपताना केस बांधून झोपता की मोकळे सोडून?

तुमचे केस लांबलचक असतील तर दिवसभर त्यांची निगा राखण्यास भरपूर वेळ तुम्ही घालवत असाल... पण, रात्री झोपताना काय करायचं हा मात्र प्रश्न तुम्हाला अनेकदा पडत असेल.

केस मोकळे सोडले तर केसांचा गुंता होणार... आणि तो सोडवताना केस तुटणार... आणि बांधून ठेवले तर केसगळती वाढणार. असा अनुभव तुम्हालाही आला असेल. पण, यावर उपाय म्हणजे तुमचे केस कसे आहेत यावर झोपताना ते कसे बांधावेत हे अवलंबून आहे.

केस स्ट्रेट असतील तर...

तुमचे केस मोकळे आणि सरळ असतील तर रात्रीच्या वेळेस तुम्ही सैलसर पोनीटेल बांधून ठेवू शकता. म्हणजे ते सकाळी फ्रिझी होत नाहीत. सैलसर वेणी बांधून ठेवल्यास केसांमध्ये गुंता होणार नाही. तसेच त्यांना नॅचरल टॅग्स मिळतील. तुमचे केस लांब असतील ते बांधून ठेवणे सोयीस्कर ठरते. पण खूप वेळ आणि घट्ट बांधून ठेवू नका. यामुळे केस तुटण्याची शक्यता अधिक आहे.



केस ओले असतील तर...

केस ओले असताना ते मूळीच बांधून ठेवू नका. परंतु केसांमधील गुंतागुंत कमी करण्यासाठी तुम्हाला ते बांधून ठेवणे गरजेचे वाटत असेल तर ते सुकल्यानंतरच बांधा. यामुळे ते तुटण्यापासून बचावतील. हाच नियम ब्लो ड्रायसाठीदेखील लागू होतो. शक्य असेल तर नैसर्गिकरीत्याच सुकवण्याचा प्रयत्न करा.

कुरळ्या केसांसाठी

तुमचे केस कुरळे असतील तर डोक्यावर त्याचा आंबाडा बांधा किंवा एका बाजूला बांधून ठेवा. यामुळे तुमची झोपमोड होणार नाही याची काळजी घ्या. पण तो खूप घट्ट बांधू नका.

घरगुती क्रीम-साय

सकाळी अंघोळ केल्यावर क्रीम लावले नाही तर एक-दोन तासांतच परत त्वचा ओढली जाते आणि कोरडीही होते. बाजारातल्या नवनवीन येणाऱ्या क्रीमचा वापर तर नेहमीच केला जातो. पण नेहमीच घरात उपलब्ध असणारे क्रीम म्हणजेच साय कधीतरी वापरून पाहा.



- एक चमचा साय व लिंबाचा रस एकत्र करून रोज चेहऱ्यावर व ओठांवर लावल्यास ते फुटत नाही.
- थोडी साय व एक चमचा डाळीचे पीठ असे घरगुती उटणे साबणाला चांगला पर्याय आहे. त्यामुळे त्वचा मुलायम होते.
- मुलतानी माती बारीक करून सायीत मिसळून चेहऱ्यावर तसेच कोपऱ्यावर लावल्यास रंग उजळतो.
- तीन चार बदाम आणि दहा बारा देशी गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात एक चमचा साय मिसळून ते मिश्रण चेहऱ्यावर लावल्यास चेहऱ्यावरच्या सुरकूत्या आणि काळे डाग नाहीसे होतात.
- सायीत समुद्र फेसची बारीक पावडर मिळवून लावल्यास चेहऱ्यावरची मुरमे बरी होतात.
- मोसंबी किंवा संत्र्याची सालं वाटून त्यात साय मिसळून त्याचा लेप लावल्यास त्वचा मुलायम व स्वच्छ होते.
- एक चमचा साय व एक चमचा सफरचंदाचा रस एकत्र करून फेटून हलक्या हाताने चेहऱ्यावर मालीश केल्यास चेहऱ्याचा रंग उजळतो.
- थंडीच्या दिवसात खोकल्याचा त्रासही वाढतो. अशा वेळी अर्ध्या वाटी सायीत एक चमचा नारळाचा किस पाच मोठे वेलदोडे (पावडर) तसेच 10 मिरे भरडून बारीक गॅसवर परतून गरम करावे व झोपण्यापूर्वी गरमगरम खावे. थोडे दिवस असे केल्यास कोरडा खोकला बरा होतो.
- काशाच्या किंवा पितळी ताटलीत दोन चमचे ताजी साय थोडे पाणी घालून खूप फेटावे. साय हलकी होऊन लोण्यासारखी मऊ होईल. त्यात एक कापराची वडी बारीक करून मिसळावी. फोड, जखम यावर हे मलम लावल्यास फायदा होतो. हेच मलम लहान मुलांच्या टाळूवर घालून हलक्या हाताने मालीश केल्यास टाळू लवकर भरते व गरमीच्या दिवसात डोळ्याला थंडावा मिळतो.

क्रॅंटोमच्या पूरक औषधांनी आरोग्यावर दुष्परिणाम



काही वनौषधी कृत्रिम पूरकांच्या स्वरूपात घेतल्यास त्याचे आरोग्यावर वाईट परिणाम होतात, असे दिसून आले आहे. परदेशात जास्त वापरल्या जाणाऱ्या क्रॅंटोम या वनौषधीच्या पूरकांमुळे आरोग्याची हानी होत असल्याचे पुरावे समोर आले आहेत. क्रॅंटोम ही वनस्पती परदेशात लोकप्रिय असून तिचे वैज्ञानिक नाव मिट्रॅगना स्पेसिओसा आहे. ती कॉफी वर्गातील वनस्पती आहे. ऊर्जा वाढवणे व वेदना कमी करणे या दोन कारणास्तव आग्नेय आशियात मजूर लोक या वनस्पतीची पाने चावून खातात. क्रॅंटोमचा वापर अमेरिकेत बेकायदेशीर मानला जात नाही. लोक ऑनलाइन त्याची खरेदी करतात. हिरव्या पावडरच्या स्वरूपात ही पूरक औषधी मिळते. क्रॅंटोमचा अर्क सुरक्षित व नैसर्गिक मानला जातो. पण तो शरीरात गेल्यानंतर निष्क्रिय राहात नाही, असे संशोधकांचे मत असून अमेरिकेत त्याचा वापर अनेक वर्षे सुरू आहे. काही जण त्याचा वापर नैराश्यावर करतात, तर काहींना वेदना कमी करण्यास फायदा होतो. त्यात मिट्रॅग्नाइन हा ओपिऑइड पदार्थ असतो. या औषधीच्या वापरासाठी कुठलेही वैद्यकीय पुरावे नसले तरी त्याचा वापर अफूसारखा केला जातो. बुप्रेनोफाइनपेक्षा ही औषधी स्वस्त असते. न्यूयॉर्क विद्यापीठाचे विल्यम एगलस्टन यांनी याबाबत केलेल्या संशोधनानुसार याचे काही विषारी परिणाम हे ते औषध बंद केल्यानंतर दिसून येतात. 'जर्नल फार्माकोथेरपी' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. १ जानेवारी २०११ ते ३१ जुलै २०१८ दरम्यान लोकांनी या औषधाच्या केलेल्या वापराची माहिती घेऊन हे संशोधन करण्यात आले. त्यातून असे दिसून आले की, चिडचिडेपणा, गोंधळणे, वांत्या, भ्रम, कोमात जाणे, हृदयविकार असे परिणाम यातून होतात.

आंब्याच्या पानांनी बनलेल्या चहाचे सेवन केल्याने गायब होतील आजार, जाणून घ्या याची रेसिपी

आंब्याला फळांचा राजा म्हटले जाते. आंबा खाण्यास जेवढा चविष्ट असतो, तेवढाच आरोग्यासाठीदेखील फायदेशीर असतो. एवढंच नव्हे तर आंब्याच्या पानांमध्ये देखील बरेच गुण असतात. या पानांमध्ये बरीच व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. यात उपस्थित मंगिफेर्न नावाचा पदार्थ आरोग्यासाठी फारच फायदेशीर असतो. तुम्ही या पानांचा चहा बनवून त्याचे सेवन करू शकता. यामुळे पोटाशी निगडित बऱ्याच प्रकारचे आजार दूर होतात. आंब्याच्या पानांचा चहा तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.



आंब्याच्या पानांच्याचहाची रेसिपी : हा चहा तयार करण्यासाठी आंब्याची पाने घ्या. ही पाने पाण्यात टाकून पाणी अर्धे होईस्तोवर उकळा. या पानांचा आपला वेगळा फ्लेव्हर असतो. म्हणून यात साखर मिसळायची गरज नसते. तुम्हाला हवे असेल तर यात आंबा किंवा पेरूचा रस मिसळू शकता. यानंतर या चहाला कपात गाळून घ्या आणि गरमागरम याचे सेवन करा.

पोट ठेवेल निरोगी : पोटाला निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही आंब्याची पाने पाण्यात टाकून उकळा आणि य पाण्याला एखाद्या भांड्यात रात्रभर ठेवा. दुसऱ्या दिवशी सकाळी या पाण्याला गाळून उपाशीपोटी याचे सेवन करा. याचे नियमित सेवन केल्याने पोटाशी निगडित सर्व समस्या दूर होण्यास मदत मिळेल.

व्हेरिकोज व्हेन्सची समस्या दूर होईल : व्हेरिकोज व्हेन्सची समस्या दूर करण्यासाठी आंब्याच्या पानांना आधी पाण्यात उकळून याचा चहा तयार करून त्याचे सेवन करा. यात तुम्ही पेरू किंवा आंब्याचा रसदेखील घालू शकता.

अस्थमाच्या रुग्णांसाठी फायदेशीर : आंब्याच्या पानांना उकळून त्या पाण्यात मध मिसळून त्याचे सेवन केल्याने ब्रॉन्कायटिस आणि अस्थमाची समस्या दूर होण्यास मदत मिळते. हा चहा खोकल्याला प्रभावीपणे ठीक करतो.

ब्लडप्रेशरसाठी फायदेशीर : उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांसाठी देखील आंब्याच्या पानांचा चहा तसेच आंब्याची पाने टाकून उकळलेल्या पाण्याने अंघोळ करणे फायदेशीर असते.

मधुमेह रोग्यांसाठी फायदेशीर : आंब्याच्या पानांमध्ये एंथोसाइनिडिन नावाचे टॅनिन असते, जे सुरुवातीच्या मधुमेहाच्या उपचारात मदत करते. आंब्याच्या वाळलेल्या पानांची पूड करून काढा बनवून त्याचाही प्रयोग केला जातो, जो मधुमेह ॲंजियोपॅथी आणि मधुमेह रेटिनोपॅथीच्या उपचारात देखील मदत करतो.

अवघा दीड महिना अन् भारतातील पहिला प्रयोग फसला

'मेलोडी रोड'वर निर्बंध... रहिवाशांच्या तक्रारीनंतर बीएमसीचा निर्णय, आठवड्यातील ३ दिवस 'जय हो' बंद

काय आहे मेलोडी रोड?
भारतात पहिल्यांदाच असा मेलोडी रोड तयार करण्यात आला असून ११ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात आले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही यावेळी उपस्थित होते. सुमारे ५०० मीटर लांबीच्या या विशेष रस्त्यावर वाहन ठराविक वेगाने गेल्यास 'स्लमडॉग मिलियनेअर' चित्रपटातील 'जय हो' हे गाणे आपोआप वाजते. या मेलोडी रोडमुळे वाहनचालक ठराविक वेगात गाडी चालवतील. अतिवेग आणि अचानक ब्रेक लावण्याचे प्रकार कमी होतील. वाहतुकीचा प्रवाह अधिक सुरळीत राहील. तसेच ड्रायव्हिंगचा अनुभव अधिक आनंददायी होईल, अशी अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली होती.

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

कोस्टल रोडवरील मेलोडी रोड सुरू झाल्यानंतर अवघ्या महिनाभरातच मुंबई महानगरपालिकेला मोठा निर्णय घ्यावा लागला आहे. ब्रीच कँडी परिसरातील रहिवाशांच्या तक्रारीनंतर दर शुक्रवारी, शनिवारी आणि रविवारी रात्री १० ते सकाळी ७ या वेळेत हा मार्ग तात्पुरता बंद ठेवण्यात येणार आहे.

सततच्या आवाजामुळे नागरिक त्रस्त

या विशेष मेलोडी रोडवरून वाहन गेल्यावर 'जय हो' हे गाणे वाजते. मात्र, सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत सतत वाजणाऱ्या या संगीतामुळे परिसरातील रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. "डेसिबल पातळी नियमांमध्ये असली तरी आवाजाची तीव्रता असह्य आहे. खिडक्या उघडणेही कठीण झाले आहे, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना अधिक त्रास होत आहे," असे ब्रीच कँडी रहिवासी संघटनेच्या सदस्यांनी सांगितले.



दीड महिन्यात संगीत रस्ता बंद...
मुंबईच्या कोस्टल रोडवर विशेष संगीत पट्टया बसवण्यात आल्या होत्या. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी ११ फेब्रुवारी रोजी याचं उद्घाटन करण्यात आलं होतं. हा जगातील पाचवा आणि भारतातील पहिलाच प्रयोग असल्याचं सांगण्यात आलं होतं. मुंबईच्या कोस्टल रोडवरील येणाऱ्या-जाणाऱ्या वाहन चालकांना जय हो या गाण्याचा आवाज ऐकू येत होता. मात्र भारतातील हा पहिलाच प्रयोग तेथील रहिवाशांसाठी मात्र त्रासदायक ठरत असल्याचं दिसून येत आहे.

- जगातील पाचवा आणि भारतातील पहिलाच प्रयोग मुंबईतील कोस्टल रोडवर राबविण्यात आला होता.
- ११ फेब्रुवारी २०२६ रोजी याचं उद्घाटनही करण्यात आलं होतं.

बीएमसीचा रात्रीच्या वेळी बॅरिकेडिंगचा निर्णय

बीएमसी अधिकाऱ्यांनी सांगितले की, तक्रारीनंतर संबंधित अधिकाऱ्यांनी परिसरात जाऊन आवाजाची पातळी तपासली. ती सुमारे ९ डेसिबल असून निवासी भागासाठी परवानगीच्या मयार्देत आहे. तथापि, रात्रीच्या वेळी आवाज अधिक त्रासदायक ठरत असल्याने पायलट प्रकल्प म्हणून शुक्रवारी ते रविवारी रात्री हा मार्ग बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आठवड्याच्या इतर दिवशी मात्र दिवस-रात्र हा मार्ग सुरू राहणार आहे.

वाहतूक नियंत्रणासाठी उपाय

बुधवारपासून बीएमसीने 'एल' आकारात बॅरिकेडिंग करून काही भागात वाहतूक मर्यादित केली आहे. यामागचा उद्देश म्हणजे या मार्गावरून जाणाऱ्या वाहनांची संख्या कमी करणे.

ग्रामीण भागातील महिलांची पुन्हा चुलीकडे वाटचाल



■वसई। प्रतिनिधी,

केंद्र सरकारच्या उज्वला योजनेमुळे धूरमुक्त स्वयंपाकघराचे स्वप्न पाहणाऱ्या ग्रामीण महिलांना आता महागाईमुळे पुन्हा चुलीचा आधार घ्यावा लागत आहे. गॅस सिलिंडरचे वाढलेले दर आणि वेळेवर उपलब्धता नसल्याने महिलांचे दैनंदिन जीवन पुन्हा जुन्याच अडचणीत अडकले आहे. देशातील गरीब महिलांना धुरापासून मुक्तता मिळावी आणि त्यांचे आरोग्य सुधारावे या उद्देशाने केंद्र सरकारने उज्वला योजनेअंतर्गत गरीब कुटुंबांना स्वयंपाकासाठी गॅस जोडणी दिली. या योजनेमुळे अनेक महिलांच्या स्वयंपाकघरात चुलीऐवजी गॅसचा वापर सुरू झाला आणि त्यांचे जीवन काही प्रमाणात सुधारले. वसई तालुक्यात सुमारे ५६४० लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळाला. सुरुवातीला महिलांमध्ये आनंदाचे वातावरण होते. धुरापासून मुक्तता मिळाल्याने आरोग्य सुधारण्यास मदत झाली आणि स्वयंपाकाची प्रक्रिया सुलभ झाली. मात्र, हे सुख फार काळ टिकले नाही. सध्या गॅस सिलिंडरचे दर सुमारे ९०० रुपयांच्या घरात पोहोचले आहेत. इतकी मोठी रक्कम महिन्याच्या खचार्तून काढणे अनेक कुटुंबांना शक्य होत नाही. त्यातच गॅस बुकिंग करूनही वेळेवर सिलिंडर मिळत नसल्याच्या तक्रारीही वाढत आहेत. या सर्व कारणांमुळे ग्रामीण भागातील अनेक महिलांनी पुन्हा पारंपारिक चुलीचा वापर सुरू केला आहे. सरपण गोळा करण्यासाठी महिलांना अतिरिक्त मेहनत घ्यावी लागत आहे. त्यामुळे त्यांचा वेळ आणि श्रम दोन्ही वाढत आहेत, तसेच आरोग्याच्या समस्या पुन्हा डोके वर काढण्याची भीती निर्माण झाली आहे. महागाईमुळे उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ बसवणे कठीण झाले आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवताना गॅससारख्या सुविधांवर खर्च करणे शक्य होत नाही. परिणामी, उज्वला योजनेचे उद्दिष्ट पूर्णत्वास जाताना अडचणी निर्माण होत असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसत आहे.

दीड लाखांपर्यंत कॅशलेस उपचार

अपघातग्रस्तांसाठी 'पीएम-राहत' योजना प्रभावीपणे राबवा : आरोग्य मंत्री



■मुंबई। प्रतिनिधी,

रस्ते अपघातात जखमी होणाऱ्या नागरिकांना तातडीने दीड लाखांपर्यंतचे कॅशलेस उपचार मिळतात. 'पीएम-राहत' योजनेच्या माध्यमातून कॅशलेस उपचार मिळत असल्याने ही योजना प्रभावीपणे राबवा, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. रुग्णाला 'गोल्डन अवर'मध्ये तातडीचे उपचार देऊन मृत्युदर कमी करण्यास वचनबद्ध व्हावे, असे आवाहन आरोग्य मंत्र्यांनी जनआरोग्य योजनेच्या बैठकीत केले आहे.

केंद्र शासनाच्या रस्ते परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने रस्ते अपघातातील जखमींना तातडीने उपचार मिळावेत, यासाठी 'पीएम-राहत' योजना आणली आहे. या योजनेअंतर्गत 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' व 'महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना'अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या राज्यातील कोणत्याही रुग्णालयात दाखल झालेल्या अपघातग्रस्तांना तातडीने ७ दिवसांपर्यंत दीड लाख रुपयापर्यंतचे उपचार पूर्णतः निशुल्क देण्यात येणार आहेत. अनेकदा अपघात झाल्यावर आर्थिक अडचणींमुळे उपचारास विलंब होतो. वेळेत उपचार मिळत नाहीत. 'पीएम-राहत' योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास अपघाती मृत्यूचे प्रमाण कमी होईल, असा विश्वास आरोग्य मंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

या बैठकीला आरोग्य सचिव ई. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, जनआरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणासाहेब चव्हाण, नागरी आरोग्य अभियान आयुक्त सुनील भोकरे, जन आरोग्य योजनेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दयानंद जगताप, आरोग्य विभागाच्या सह संचालिका डॉ. सुनीता गोल्हाईत व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

डिझिग्नेटेड व नॉनडिझिग्नेटेड रुग्णालयात उपचार!

रस्ते अपघातानंतर २४ तासांच्या आत रुग्णालयात दाखल झालेल्या सर्व अपघातग्रस्त भारतीय तसेच परदेशी नागरिकांनाही 'पीएम राहत' योजनेचा लाभ मिळणार आहे. उपचार खर्च अपघाताच्या तारखेपासून कमाल ७ दिवसांपर्यंत कव्हर केला जाणार आहे. या योजनेअंतर्गत डिझिग्नेटेड व नॉनडिझिग्नेटेड रुग्णालयांमध्येही उपचार करता येणार आहेत.

नोडल एजन्सीची नियुक्ती

'पीएम-राहत' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत राज्य आरोग्य सोसायटीच्या प्रशासनाची भूमिका महत्त्वाची असून, रुग्णाला तातडीने उपचार मिळावेत, यासाठी अंगीकृत रुग्णालयात दाखल करणे. पोलिसांकडून अपघाताची खात्री करून उपचारांना मान्यता देणे, पीएम राहत योजनेंतर्गत उपचारास मंजुरी देणे व मंजूर दावे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे सादर करण्याची आरोग्य सोसायटीची जबाबदारी आहे. महाराष्ट्रात ही योजना राबवण्यासाठी परिवहन विभागाच्या अखत्यारितील 'राज्य रस्ते सुरक्षा परिषद' ही नोडल एजन्सी नियुक्त करण्यात आली आहे.

माथेरान 'मिनी ट्रेन'च्या फेऱ्या घटल्याने पर्यटक नाराज

'मोटारकार' सेवा पुन्हा सुरू करण्याची मागणी

■माथेरान। प्रतिनिधी,

निसर्गसौंदर्याने नटलेले आणि वाहनमुक्त पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेल्या माथेरान येथील मिनी ट्रेन आजही पर्यटकांसाठी मोठे आकर्षण आहे. नेरळ-माथेरान दरम्यानच्या रेल्वे सेवांमध्ये झालेली कपात आणि प्रवासाचा वाढलेला कालावधी यामुळे पर्यटकांसह स्थानिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

पूर्वी नेरळ-माथेरान मार्गावर दररोज पाच फेऱ्या धावत असत. सध्या ही सेवा केवळ दोन फेऱ्यांवर मर्यादित झाली आहे. २६ जुलैच्या महापुरात रेल्वे ट्रॅकचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. दुरुस्तीवर मोठा खर्च करण्यात आला; मात्र सेवा वाढवण्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.



पर्यटनवाढीस चालना मिळेल

मोटारकार सेवा पुन्हा सुरू केल्यास प्रवासाचा कालावधी दीड तासांच्या आत आणणे शक्य होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. यामुळे पर्यटकांना जलद, सुरक्षित आणि वेगळा अनुभव मिळू शकतो. तसेच मिनी ट्रेनच्या तुलनेत कमी मनुष्यबळ लागल्याने रेल्वे प्रशासनाचा खर्चही कमी होण्याची शक्यता आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, मोटारकार सेवेसाठी थोडा अधिक दर आकारला तरी पर्यटक तयार आहेत. त्यामुळे ही सेवा पर्यटनवाढीस चालना देणारी ठरू शकते. रेल्वे प्रशासनाने याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन नवी योजना राबवावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

पर्यटक-व्हीआयपींसाठी आकर्षण सेवा
सध्या मिनी ट्रेनचा प्रवास अडीच ते तीन तासांचा होत असून पूर्वी हा प्रवास सुमारे दोन तासांत पूर्ण होत होता. त्यामुळे सुरुवातीला आकर्षक वाटणारा हा प्रवास पुढे जाऊन कंटाळवाणा ठरत असल्याच्या प्रतिक्रिया पर्यटकांकडून मिळत आहेत. अनेक पर्यटक एकदाच अनुभव घेतल्यानंतर पुन्हा ट्रेनने प्रवास टाळत असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर कालका-शिमला रेल्वेप्रमाणे ह्यमोटारकारह्ण सेवा पुन्हा सुरू करण्याची मागणी जोर धरत आहे. सुमारे ४० वर्षांपूर्वी नेरळ-माथेरान मार्गावर मोटारकार सेवा उपलब्ध होती. या कारमध्ये १० ते १५ प्रवासी आरामात प्रवास करू शकत आणि कमी वेळात घाटमाथ्यावर पोहोचत असत. विशेषतः पर्यटक आणि व्हीआयपींसाठी ही सेवा आकर्षण ठरत होती.

राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थिनींसाठी 'पिंक'रूम

शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांचे सूतोवाच

■पुणे। प्रतिनिधी,

राज्यातील शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनींच्या आरोग्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी आता प्रत्येक शाळेत 'पिंक रूम' ही नवी संकल्पना राबवण्यात येणार आहे. पुण्यातील स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित 'राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा अभियाना'च्या उद्घाटन प्रसंगी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी हे महत्त्वपूर्ण सूतोवाच केले. स्वसंरक्षण हे केवळ शारीरिक प्रशिक्षण नसून ती विद्यार्थिनींच्या आयुष्यातील एक महत्त्वाची शिस्त आहे, असे सांगत प्रत्येक मुलीने स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम झाले पाहिजे, असा संदेश त्यांनी यावेळी दिला.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे जिल्हा परिषद आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, आमदार हेमंत रासने, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक डॉ. हेमंत वसेकर, शिक्षण संचालक महेश पालकर, शरद गोसावी, कृष्णकुमार पाटील आणि इतर मान्यवर उपस्थित होते. या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमात ग्रँडमास्टर शिफुजी शौर्य भारद्वाज आणि त्यांच्या चमूने पुण्यातील ४७६ शाळांमधील सुमारे १२ हजार विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रत्यक्ष धडे दिले.

यावेळी मंत्री भुसे यांनी स्पष्ट केले की, जेव्हा एखादी मुलगी स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम होते, तेव्हा तिचे मनोबल उंचावते आणि तिच्या संपूर्ण जीवनात एक शिस्त निर्माण होते. हीच शिस्त देशाला बलशाली बनवण्यासाठी महत्त्वाची ठरणार असून या अभियानामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थिनी खऱ्या अर्थाने 'निर्भय' आणि 'आत्मनिर्भर' होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आगामी काळात शालेय स्तरावर दिल्या जाणाऱ्या सैनिकी प्रशिक्षणातून 'राष्ट्र प्रथम आणि देश सर्वोच्च' ही भावना विद्यार्थ्यांच्या मनात रुजवली जाणार आहे. २६ जानेवारी २०२६ रोजी देशभरातील २ कोटींपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी एकत्रित कवायत करून जो विश्वविक्रम प्रस्थापित केला, तो देशासाठी अभिमानास्पद असल्याचेही त्यांनी सांगितले. महापौर नागपुरे यांनी सांगितले की, राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षणासारखे उपक्रम केवळ एक दिवसाचे प्रशिक्षण नसून ते आयुष्यभराचे शिक्षण आहे आणि आपल्यातील सुप्त शक्ती जागृत करण्याची हीच खरी वेळ आहे.



हॉटेलवर पोलिसांची रेड, 11 तरुण आणि 4 तरुणी नको 'त्या' अवस्थेत, पोलिसांनी सुट्टी दिली नाही..


■मुंबई। प्रतिनिधी,

उत्तर प्रदेशातील फिरोजाबाद येथील मक्खनपुर क्षेत्रात शनिवारी सायंकाळी, बायपास रोडवरील पारस हॉटेलमध्ये देहव्यापार होत असल्याच्या वृत्तानंतर पोलिसांनी हॉटेलवर छापा टाकला होता, घटनास्थळी पथक पोहोचताच आतमध्ये एकच गोंधळ उडाल्याचं चित्र होतं. हॉटेलमधील खोल्यांवर रेड टाकण्यात आली असता, परिसरात एकच गोंधळ उडाल्याचं चित्र आहे.

बायपास रोडवरील हॉटेलवर छापा
संबंधित प्रकरणात अवैध कारवाया होत असल्याची माहिती समोर आल्यानंतर त्यांनी बायपास रोडवरील हॉटेलवर छापा टाकण्यात आला होता. अधिकारी आणि पोलीस पथकाला बघताच तरुणांनी छतावरून उडी मारून घटनास्थळावरून पळ काढला.

सात मोटार सायकली जप्त

पोलिसांनी त्यांना अटक केली असता, सात मोटार सायकली जप्त केल्या आणि हॉटेल सील करण्यात आल्याची माहिती आहे. घटनास्थळी आढळलेल्या सर्वांना रविवारी दुपारी तुरुंगात पाठवण्यात आले होते. संबंधित प्रकरणात पोलीस प्रशासनाने कारवाई केली असता, 17 जणांविरोधात एफआरआय दाखल केली.



11 तरुण आणि चार तरुणी

पोलिसांच्या ताब्यात

पोलिसांनी घटनास्थळाला वेढा घालून 11 तरुण आणि चौघींनी ताब्यात घेतले आणि त्यांच्याकडील असलेले पैसे, फोन जप्त केला. संबंधित प्रकरणात 15 जणांविरुद्ध एफआरआय गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच आरोपींना न्यायालयात हजर केलं जाणार आहे.

भाड्यावरुन वाद झाला, भाडेकरुने थेट मालकाच्या 8 वर्षाच्या मुलीलाच संपवले अन् मृतदेह पिठाच्या डब्यात लपवून पळाला

■मुंबई। प्रतिनिधी,

एका भाडेकरुने आपल्याच घरमालकाच्या 8 वर्षाच्या चिमुरडीचे अपहरण करुन तिची निर्घृण हत्या केली आहे. प्रज्ञा असे मृत मुलीचे नाव आहे. चिमुरडीची हत्या केल्यानंतर तिचा मृतदेह आरोपीने घरातील पिठाच्या डब्यात सपवून ठेवला होता.

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. उत्तर प्रदेशातील आग्यार्तील सिद्धार्थ नगर परिसरातील ही घटना आहे.

घराच्या भाड्यावरुन वाद

मिळालेल्या माहितीनुसार, दिनेश कुमार यांच्या घरात सुनील कुमार नावाचा तरुण गेल्या काही महिन्यांपासून भाड्याने राहत होता. तो दिनेश यांच्याच बुटाच्या कारखान्यात कामही करायचा. सुनीलने गेल्या काही महिन्यांपासून घराचे भाडे दिले नव्हते, ज्यावरून वाद सुरू होता. मंगळवारी सायंकाळपासून प्रज्ञा अचानक बेपत्ता झाली होती. कुटुंबीयांनी तिचा सर्वत्र शोध घेतला, मात्र ती न सापडल्याने अखेर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी तपास सुरू केला असता सुनीलच्या हालचालींवर संशय आला. त्याच्या खोलीची झडती घेतली असता, पिठाच्या डब्यात प्रज्ञाचा मृतदेह आढळून आला.



फरार आरोपीला पकडण्यासाठी 10 पथके
मुख्य आरोपी सुनील कुमार अद्याप फरार असून त्याच्या शोधासाठी पोलिसांनी दहा पथके तयार करण्यात आली आहेत. पोलिसांनी आतापर्यंत चार संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. ₹आम्ही या प्रकरणाचा अत्यंत गांभीयार्ने तपास करत आहोत आणि दोषीला लवकरात लवकर अटक करून कठोर शिक्षा दिली जाईल,₹ असे आश्वासन पोलीस प्रशासनाने दिले आहे. आपल्या पोटच्या गोळ्याला अशा प्रकारे गमावल्यामुळे प्रज्ञाच्या पालकांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा आहे.

आरोपीला तात्काळ फाशी देण्याची मागणी

या क्रूर घटनेची बातमी वाऱ्यासारखी पसरताच स्थानिक रहिवासी आणि प्रज्ञाच्या नातेवाईकांचा संयम सुटला. संतप्त जमावाने रास्ता रोको करून जोरदार निदर्शने केली. यावेळी काही वाहनांची तोडफोड करण्यात आली असून आरोपीला तात्काळ फाशी देण्याची मागणी करण्यात येत आहे. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून डीसीपी सिटी अली अब्बास यांच्यासह मोठा पोलीस ताफा घटनास्थळी तैनात करण्यात आला आहे. सध्या परिसरात तणावपूर्ण शांतता असून प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

लिव्ह-इन पार्टनर महिलेच्या दोन मुलींवरच बलात्कार

नेमकी घटना काय?
उपअधीक्षक बी. व्ही. गोहिल यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गेल्या सहा वर्षांपासून चिखली तालुक्यात एका महिलेसोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होता. ती महिला तिच्या पहिलाय पतीपासून झालेल्या 13 आणि 14 वर्षांच्या दोन मुलींसह राहत होती. एवढंच नव्हे तर आरोपीचे दोन अल्पवयीन मुलं देखील या महिलेसोबतच राहत होते. कारण महिलेचा सात वर्षांपूर्वी घटस्फोट झाला होता. एका घरात एकत्र राहणाऱ्या या कुटुंबात ही घटना घडली. पोलिसांच्या माहितीनुसार, जेव्हा महिलेच्या एका मुलीने पोटदुखीची तक्रार केली, तेव्हा डॉक्टरांनी वैद्यकीय तपासणी केली. तपासणीत 14 वर्षांची मुलगी गर्भवती असल्याचे उघड झाले. त्यानंतर, दोन्ही मुलींनी सांगितले की, आरोपीने गेल्या अनेक महिन्यांपासून त्यांच्यावर वारंवार बलात्कार केला होता. दुसऱ्या मुलीचीही वैद्यकीय तपासणी सुरू आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

गुजरातच्या नवसारी जिल्ह्यातील एका 38 वर्षीय व्यक्तीला त्याच्या लिव्ह-इन पार्टनरच्या दोन अल्पवयीन मुलींवर वारंवार बलात्कार करून त्यापैकी एकाला गर्भवती केल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी बुधवारी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जेव्हा 14 वर्षीय मुलीने पोटदुखीची तक्रार केली, तेव्हा वैद्यकीय तपासणीत ती गर्भवती असल्याची धक्कादायक बाब उघड झाली. त्यानंतर, दोन्ही मुलींनी जो जबाब दिला त्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला दोन्ही पीडित मुलींनी आरोपीविरुद्ध वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचे आरोप केले. ज्यानंतर आरोपीविरुद्ध पॉक्सो कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली असून, स्थानिक पातळीवर चिंता व्यक्त केली जात आहे. आरोपीला मंगळवारी अटक करण्यात आली. पोलीस पुढील तपास करत आहेत.



भाईंदरमध्ये घरकाम करणाऱ्या महिलेची हत्या करणाऱ्या आरोपीला विशाखापट्टणममधून अटक

■भाईंदर। प्रतिनिधी,

भाईंदरमध्ये घरकाम करणाऱ्या महिलेचीच हत्या करून पसार झालेल्या आरोपीला मिरा भाईंदर गुन्हे प्रकटीकरण शाखा झ १ ने विशाखापट्टणम येथून अटक केली आहे. मिरारोडच्या सिल्वर पार्क परिसरातील चंद्रेश आर्केड, बिल्डिंग नंबर २७ मधील गौरव मेश्राम यांच्याकडे सुमन कांबळे या मागील तीन चार वर्षांपासून घरकाम करत होत्या. गौरव यांच्या घरी त्यांचा लहान भाऊ आशिष मेश्राम हा राहायला आला होता. मेश्राम हा कांबळे यांना शारीरिक संबंध ठेवण्यासाठी वारवांर त्रास देत होता. मात्र कांबळे या त्याला नकार देत होत्या. त्यातून आशिष व कांबळे यांच्यात वाद झाला. याप्रकरणातून कांबळे यांच्या मुलाने काही दिवसांपूर्वीच आशिषला मारहाण केली होती. तर कांबळे यांनी गौरव मेश्राम यांच्या घरी काम करणे सोडून दिले होते. या सर्व प्रकारांनी गौरव यांनी भाऊ आशिष याला घरातून हाकलून दिले होते. भाऊ आता आपल्याकडे रहात नाही. त्यामुळे परत कामावर या असे गौरव यांनी कांबळे यांना सांगितल्या वर त्यांनी पुन्हा कामावर जाण्यास सुरवात केली होती. या सर्व गोष्टींचा राग धरून आशिष याने बुधवारी रात्री कांबळे घरकामासाठी येणार म्हणून पाळत ठेवली. कांबळे या कामावर आल्या असता पाठीपाठ आशिष हा घरात घुसला व धारदार हत्याराने पोटावर, छातीवर, मानेवर वार करुन त्यांना जिवे ठार मारत घटनास्थळावरून पळून गेला होता.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com